## ADVISORY BOARD

**Mark Tory**
**Head,** Dept. of English
Karistad University, Karistad, Sweden.

**Dr. Ramdev Bharadwaj**
**Pro-Vice Chancellor**
Makhanlal Chaturvedi Patrakarita
Vishwavidhyalaya, Bhopal

**Dr. Hemixa Rao**
**Vice Chancellor**
Hem. North Gujarat University, Patan - 384 265

**Dr. Vijay Bobade**
**Associate Professor & Head**
Hem. Yaswant Mahavidyalaya, Wardha

**Dr. Shailendra Deolankar**
**Associate Professor**
Govt. Vidarbha Institute of Science
& Humanities, Amravati

**Dr. Vijaykumar S. Chobe**
**Dean,** Faculty of Law
Sant Gadge Baba Amravati University,
Amravati. Cell : 9422157157

## EDITORIAL BOARD

**Dr. Subhash Gawai**
**Head,** Dept. of Political Science
Bhartiya Mahavidyalaya, Amravati.

**Dr. Shantaram Chavan**
**Head,** Dept. of Political Science
Art, Science College, Chikhaldara.

**Dr. Ramdas N. Fulari**
**Principal,** Dr. Shyamaprasad Mukharji Kala
Mahavidyalaya, Shendurjanaghat, Dist. Amravati.

**Dr. Vinay Kodape**
**Head,** Dept. of Political Science
K.N. College, Karanja (Lad)

**Dr. Dharmendra Telgote**
**Principal,** Shri Babasaheb Deshmukh
Parvekar Mahavidyalaya, Parva.

**Dr. Avinash Moharil**
**Principal,**
Mahila Mahavidyalaya, Amravati.

**Dr. Rekha Wankhede**
**Head,** Dept. of Political Science
P.S.S.College of Art, Commerce, Pawani.

**Dr. Daya Pande**
**Head,** Dept. of Sociology
Bhartiya Mahavidyalaya, Amravati.

**Dr. Rashmi Gajre**
**Head,** Dept. of Home Economics
Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal.



**Estd.2008 / Total Issues - 24**

**ISSN 0975-590X / Peer Revieved Journal**

Managing Editor - Dr. Subhash Gawai
Publisher - Dr. Shantaram Chavan

**Subscription :**

Individual - Rs. 1000/- for five years
Institutional - Rs. 1500/- for five years
Single Issue price - Rs. 100/-

**Address :**

**C/o. Dr. S.S. Gawai**
1, Abhinav State Bank Colony, Chaprashipura,
Camp, Amravati (Maharashtra), India. 444602 Contact : 9822736136(G)
E-mail : sushreegawai@yahoo.in / Subhashgawai23@gmail.com
Website : www.darj.org

**Design & Printing :**
**B.Suraj Graphics, Akola.**
**Mob.: 9923136443**

**ISSN 0975-590X**
9 770975 590004



All rights are reserved with the publisher. The opinion expressed are of the authors & the association. Editorial board, as well as the peers' committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary Matter in Amravati City Only.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार व कार्य

प्रा. कु. रश्मी दहा
मराठी विभागप्र
श्री गणेश कला महाविद्याल
कुंभारी, जि. अको

प्रस्तावना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आधुनिक विदर्भातील एक थोर संतकवी ! विदर्भ म्हणजे संतजनांची एक सुखद सरिताच होय. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्यानंतर देशोन्नतीसाठी स्वतःला आजन्म वाहून घेतलेले एक महान लोकसंत !! ग्रामोध्दार, ग्रामशिक्षण, आरोग्य संपन्नता, सहजीवन, सद्‌विचार, स्वावलंबन, स्वयंपूर्णता, सहकार्य आणि सर्वोदय या विचार धारणेतून उदयाला आलेले एक श्रेष्ठ राष्ट्रसंत !!! राष्ट्रसंताची जनजागृती व्यापक स्वरूपाची होती. त्यांची राष्ट्रनिष्ठा पराकोटीला पोहाचलेली होती. आपल्या देशालाच ते देव मानत होते. देश सेवेलाच धर्म मानत होते. सकलांच्या जीवनात सुखाची निर्मिती करणारा आणि सकलांना तारणारा असा त्यांचा राष्ट्रधर्म होता. समाज प्रबोधनासाठी तर त्यांनी आसेतु हिमाचल प्रवास केला. राष्ट्रसंत 'लोक जागरणाचे' लोकयोगी संत होते ! राष्ट्रीय अस्मितेचे एक महान गायक होते.

महात्मा ज्योतीराव फुले यांनी सर्वकष मानवी प्रतिष्ठेसाठी सर्वप्रथम रणशिंग फुंकले. सामान्य माणसाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सर्वप्रथम टाहो फोडला. मानवी जीवनात जे जे कालबाहय आहे, कुरूप आहे, त्याज्य आहे, नित्कृष्ट आहे, अनिष्ट आहे, लांछनास्पद आहे, हानिकारक आहे, गतिबाधक आहे, भ्रममूलक आहे त्या विरूध्द त्यांनी सर्वप्रथम युध्द पुकारले. महात्मा फुले यांच्यानंतर राजर्शी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सामाजिक समतेच्या उभारणीची पताका आपल्या हाती घेतली.

## *राष्ट्रसंताची ग्रामस्वराज्याची संकल्पना :-*

भारत हा कृषीप्रधान देश आहे. खरा भारत हा खेडयात वसलेला आहे. त्यामुळे आपल्या देशाचे खरे स्वरूप बघायचे असेल तर आपले खेडेच बघावे लागेल. आपल्या खेडयांचा विचार केल्या शिवाय भारताचे खरे चित्र आपल्या नजरे समोर उभे राहणार नाही.

महात्मा गांधीनी ग्रामस्वराज्याची कल्पना मांडली. पण ती प्रत्यक्षात येवू शकली नाही कारण त्यांनी या देशाच्या स्वातंत्र्याचा बालरवी तेवढा पाहिला. तो उगवत असतानाच त्यांची एक माथेफिरूने हत्या केली. त्यांनी बघितलेले स्वप्न, 'खेडयाकडे चला' हा दिलेला संदेश – राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या जीवनभर अंगिकारला. 'स्वराज्याचं सुराज्य' निर्माण व्हावं म्हणून तुकडोजी महाराजांनी आप‍ हयातभर प्रयत्न केला. राष्ट्रसंतानी ग्रामाचं सारं दुःख पाि आणि हया देशाचं चित्र आणि भवितव्य त्यांनी ग्राम गीतेत ओवीतून व्यक्त केले.

## *ग्रामगीता : ग्राम स्वराज्याचा मूलमंत्र :-*

गाव हा देशाचा नकाशा। गावावरून देशाची परीक्षा।
गाव भंगता येईल अवदसा। देशासाठी।।

तुकडोजींनी खेडी सुक्ष्मपणे अनुभवली होती. तिथ ब–यावाईट बाबींची त्यांना पूर्ण कल्पना होती. ग्रामगी त्यांनी सुखी, संपन्न व सत् प्रवृत्त ग्राम जीवनाचे स्वप्न मां आहे. खेडयापाडयातील जनसामान्यासाठी अपूर्व असा ग्र आहे. 'सर्व ग्रामासी सुखी करावे' हे ग्रामगीतेचे प्रयोजन अ गाव हा विश्वाचा घटक व खेडयातील माणूस हा मान समुहाचा लहानात लहान घटक. या घटकात सुधार घडवूनच जग सुखी करता येईल ही तुकडोजींनी हेरले ह ग्रामनाथाला जागे करण्यासाठी त्यांनी ग्रामगीता लिहिली.

ग्रामगीता हा ग्रामीण काव्य ग्रंथ आहे. त्याचे ना 'ग्रामगीता' आहे व तो ग्रामनाथाला अर्पण केला आहे. हा ए अद्‌भूत आणि अप्रतिम ग्रंथ आहे. 'ग्रामगीता' हे मराठी ग्राम साहित्याचे गौरीशंकर आहे. ग्रामगीतेत ग्रामसुधारणेचा विच प्रमुख आहे.

ग्रामगीतेत ग्रामिणांनी आपले दैनंदिन जीवन कसे जग याबाबतीत आदेश केला आहे. ग्रामगीतेत ग्रामआरो ग्रामशुध्दी, यासारखे अध्याय आहेत. महिलोन्नती, वैवाहि जीवन, अंत्यसंस्कार, सणोत्सव, यात्रा मेळे याबाबत त्यां प्रबोधन केले आहे. ग्रामाच्या सर्वांगिण विकासाची तुकडोजीं तळमळ व त्यांची दृष्टी प्रकर्षाने जाणवते. "आपल्या देशाती झोपी गेलेली खेडी जागी व्हावीत. अज्ञान, लोकभ्रम आ सामाजिक जडत्व, प्रथा, अनिष्ट परंपरा यामुळे खेडयाती जीवनाला जी अवकळा आली ती नाहीशी व्हावी. हा दे शिक्षण, आरोग्य धनधान्य इ. बाबतीत वैभवशाली व्हा यासाठी तुकडोजींची तळमळ होती.

## *राष्ट्रसंताचे ग्रामसुधारणाविशयक विचार :-*

राष्ट्रसंत एक युग प्रवर्तक संत होते. एक थोर विचारव प्रतिभासंपन्न साहित्यिक, श्रेष्ठ क्रांतिकारक, तत्वज्ञ पंडि परम देशभक्त, निर्भय समाजसुधारक, निःसीम भूतदयाप्रे आणि सर्वसामान्यांचे जननायक होते. स्वातंत्र्याच्या सा वर्षानंतर हे चित्र आम्ही उघडया डोळयाने बघतो आहोत.

शहरीकरणाकडे आकर्षला जात आहे. सुपिक जमिनी उद्योगाच्या नावाने पडीक होत आहेत.

आज भरपूर उत्पादन। हेचि जनसेवेचे साधन।
त्यासाठी झटेल जो जो जन। गीता कळली तयासि।।

### श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व :-

श्रमाचं महत्त्व सांगताना राष्ट्रसंत म्हणतात, मंदिरात जावून पूजा करीत बसावे — जोर जोरात देवाचे नामस्मरण करावे, अशाने देव पावत नसतो राष्ट्रसंत म्हणतात —

एक हात खोदावी जमीन। हे पुजनाहुनि पूजन।
परिणामी शेकडो व्याख्यानांहून। अधिक तयाचा।।
श्रमिकास जेणे लाभेल अन्न। ते कर्म श्रेष्ठ यज्ञाहून।।

श्रमाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. म्हणजेच श्रमिकाला पोटभर अन्न मिळेल — हेच तत्वज्ञान गीतेने आम्हाला सांगितले.

### ग्रामसाम्राज्याची कल्पना :-

धर्मकारण आणि राजकारण, धार्मिकता आणि राष्ट्रीयता, अध्यात्मिक शांती आणि सामाजिक क्रांती, व्यक्तिगत सद्वर्तन आणि सामूहिक परिवर्तन या गोष्टींचा समतोल आणि समन्वय साधावा, आणि त्याव्दारे नवधर्म नवसमाज यांच्या संस्थापनेचे कार्य केले पाहिजे. हाच महाराजांच्या जीवनाचा संदेश आहे. ते स्वतः कर्ते सुधारक होते. महाराजांनी विशुध्द राजनीतीचे पाठ दिले. राजनीती पवित्र व स्वच्छ असली पाहिजे, असे त्यांनी निक्षून सांगितले. देशाचे नेतृत्व निःस्पृह, नीतिमान व कर्तबगार व्यक्तीच्या हातात असावे, असे ते सांगतात.

महाराजांची ग्राम साम्राज्याची कल्पना अशी आहे —

"अवघाचि संसार व्हावा सुखी। मंगलता निघो सर्वमुखी।।
खळ—दुर्जनांची ही दृष्टी निकी। व्हावी सर्वदा।।
मित्रता नांदावी सर्व जनी।
उणीव न दिसावी कोठे कोणी।।
जी इच्छा करिता प्राणी। व्हावी पूर्ण न्यायें।।

### राष्ट्रसंताचे शिक्षण विषयक विचार :-

### राष्ट्रसंत : एक शिक्षण तज्ञ :-

रूढार्थाने अल्पशिक्षित पण सर्वार्थानी महान प्रज्ञाशाली अशा या प्रतिकाराच्या जीवनदृष्टीचाच मंगलमय विलास आहे' अशा सर्वार्थ गौरव राष्ट्रसंताचा करता येईल. ते श्रेष्ठ शिक्षणतज्ञ होते. इतकेच नव्हे तर ते एक द्रष्टे समाजसुधारकही होते.

प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा अभ्यास राष्ट्रसंतांना पुरेपूर होता. म्हणून ते आवर्जुन सांगत असत —

या कोवळया कळयांमाजे
विकसीता प्रगटतील समाजी
शेकडो महापुरूष।।

अशा प्रकारे आपल्या ग्रामेगीतेव्दारे राष्ट्रसंत लहान मुलास योग्य शिक्षण का द्यावे यासंबंधी आपले विचार स्पष्ट करतात. ग्रामीण भागातील मुलांच्या मनामध्ये निर्माण झालेला न्यूनगंडही दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. ते प्रचलित शिक्षणपध्दतीवर टीका करतात.

करावे काय शिक्षण ते ?कधी कामासि येईना।।
पुस्तके पाठ करूनीही, लाभ अंती नसे कोणा।।

अशा प्रकारे शहाणे बनविण्याचा नुसता कारखाना निर्माण करून समाजाचा विकास होणार नाही याची जाणीव राष्ट्रसंतांना होती.

### व्यावसायिक शिक्षणाची निकड :-

पूर्वी समाजात अठरापगड जाती होत्या. बारा बलुतेदार होते. पुढे पुस्तकी ज्ञान वाढत गेले. परिणामी व्यवसायाचा विसर प्रत्येकास पडत गेला. परंतु राष्ट्रसंत ग्रामीणच नव्हे तर शहरी भागातील विद्यार्थ्यांनाही आपल्या पूर्वापार चालत आलेल्या व्यवसायाकडे वळण्याचा सल्ला देतात.

आज नुसते पुस्तकी ज्ञान वाढीस लागले आहे. हे ज्ञान आम्हास पढतमुर्ख तर बनवत नाही ना ?ही शंका त्यांना सदोदीत सतावत असे. शेतीचा विचार करीत असता, शेतीची पदवी घेणारी मुले व विद्यालये शहरात आहेत. 'पण त्यांना शेतीची माहिती नाही. फक्त पोट भरण्याकरिता नौकरी मिळावी म्हणजे पुरे असे त्यांचे म्हणणे आहे. खेडयाचा विकास करताना खेडयात उच्च शिक्षण संस्था उभारण्याच्या बारबतीत ते आग्रही होते. व्यवसाय शिक्षण हे प्रत्येक विद्यार्थ्याचे मनातले न्यूनगंड पुसून टाकण्यास कारणी भूत ठरेल हा विश्वास राष्ट्रसंताना होता.

### राष्ट्रसंताचा शिक्षण संदेश :-

भारत स्वतंत्र होताच रात्रीचे वर्ग राष्ट्रसंतांनी जे सुरू केले त्यामागची भूमिका सर्वसामान्य जनतेस सुशिक्षित बनविणे हीच होती.

'समाजाशिक्षण घ्यावयास तव बुध्दि येवू दे पुढे।
काढ हे अज्ञानाचे मढे।।

ग्रामस्थांनी आपले जीवन फुलवले पाहिजे. याकरिता आपण समाजातूनच ज्ञान मिळवले पाहिजे. पण आपल्यात एकी होत नाही.

### विज्ञान शिक्षण शेतीसाठी लाभदायक :-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे निव्वळ अध्यात्मिक संत नव्हते तर ते विचारी, प्रगत व समाजाभिमुख संत होते. म्हणूनच आधुनिकतेचा त्यांनी सदैव पुरस्कार केलेला आहे.

विनाश तर होवू द्यायचा नसेल तर ही विज्ञानदृष्टी मानवाच्या पर्यायाने शेतीच्या उपयोगाकरिता वापरली गेली पाहिले कारण यामुळे मानव समाजाचा विकास शक्य आहे. अन्यथा विनाश अटळ आहे. हे आपण समजून घेतले पाहिजे.

### जीवनासाठी शिक्षण :-

शालेय शिक्षणाने ज्ञान येते, लोकशिक्षणाने कर्तव्याची जाणीव येते, हे जरी खरे असले तरी, दैनंदिन व्यवहारात जीवनमूल्याचे एक निराळे अधिष्ठान आहे. जर जीवनात जीवनमूल्य व तत्वनिष्ठेचे अधिष्ठान नसेल तर सुदृढ व तत्वनिष्ठेचे अधिष्ठान नसेल तर सुदृढ समाज जन्मास येवू शकत नाही. आणि म्हणूनच समाजास जीवन शिक्षणाची आवश्यकता आहे.

'विद्येअंगी व्हावा विनय, विद्याकरी स्वतंत्र निर्भय,<br>
शिक्षणाने वाढावा निश्चय, जीवन जय करावया।।<br>
याचसाठी शिक्षण घेणे की जीवन जगता यावे सुंदरपणे,<br>
दुबळेपण घेतले आंदणे, शिक्षण त्यासी म्हणो नये।।'

### शिक्षणात श्रमप्रतिष्ठेचे महत्व:-

तुकडोजींना शिक्षणासोबतच श्रमप्रतिष्ठा जीवनात रूजवायची होती. युवक असो की युवती शिक्षणासोबत त्यांना कामाची लाज न वाटणे हे समजावयाला पाहिजे कारण जोपर्यंत श्रम करणे प्रत्येकजण स्विकारणार नाही तोपर्यंत समाजाचा विकास होणार नाही.

'धनधान्य जरी भरीले वडिले।<br>
तरी कोठवरी ठिकणार असे ?।।<br>
हो शान तुझी दो दिवसाची।<br>
मग भिकची मागशि जनतेला ।।'

ही कठोर जाणीव त्यांना आहे. हीच जाणीव ते युवकास करून देतात. युवकांनी व्यसनाधीन न होता, उत्तम शिक्षण घेवून वाडवडिलांची कमविलेल्या इस्टेटीत भर टाकावी.

आज श्रमाची प्रतिष्ठापना न करणारी युवकांची टोळकी दिसतात. त्यांच्यामुळे समाजाच मातेरे होत आहे. म्हणून ज्ञानास श्रमाची जोड असणे आवश्यक आहे.

### राष्ट्रसंताचे शिक्षण विषयक विचार :-

### सर्वधर्मसमभावाचे शिक्षण :-

समाजात धर्माच्या नावाखाली सर्वत्र अधर्मच पसरत असल्याची खंत राष्ट्रसंत व्यक्त करतात. राष्ट्रसंताची सामुदायिक प्रार्थना ही खऱ्या अर्थाने सर्वधर्मसमभावाचे आदर्श केंद्र होय. आपला धर्म मोठा, परधर्माची निंदा व व्देषही न करण्याची सूचना ते देतात. आज समाजात सर्वधर्मसमभावाचेही शिक्षण अत्यंत आवश्यक असल्याचे राष्ट्रसंत आपणास सांगतात.

### जननिष्ठ शिक्षण विचाराचा स्वीकार :-

राष्ट्रसंत स्वतः शिस्तीचे भोक्ते होते. त्यांना प्रत्ये कार्य वेळेवरच व्हावे असे वाटत असे. विद्यार्थी असो की युव किंवा गृहस्थाश्रमी. जीवनात जर त्याने शिस्तीचे पालन के तर त्याचे निश्चितच कल्याण होते. जीवन शिक्षणात निर्भय आणावयाची असेल तर शिस्त व सद्गुणांचा संगम हो गरजेचे असते. आपण जे ज्ञान मिळवितो ते निर्भयतेने मिळव भय व न्यूनगंड आपल्या प्रगतीचा मार्ग संपवून टाकते. म्हणून लोकांनी निर्भय बनावे असा ते सदैव पुरस्कार करीत. अद्याप जीवन शिक्षणाचे अभ्यासक मोठया प्रमाणात प्रत्यक्षात आ नाहीत. यामुळेच बेकारीची समस्या, प्रामाणिकपणाचा अभा सौजन्याची कमतरता, स्वावलंबन वृत्तीचा ऱ्हास होत आ वेळीच आपण राष्ट्रसंताच्या शैक्षणिक दृष्टीच्या अनुरोधा सबळ पावले टाकली नाहित, तर बेरोजगारी, अनाचा भ्रष्टाचार दुर्व्यवहार यांचे प्रमाण वाढत जाईल.

राष्ट्रसंताच्या या विचारधारेवर सर्वात मोठा प्रभाव दिसत तो महात्मा गांधीचा. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचा प्रवाहाचा धागा पुढे ग्रामगीतेच्या जीवन शिक्षण अध्याया दिसून येतो.

### राष्ट्रसंताचे स्त्री-विषयक विचार :-

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनीही आयुष्यभर मानवतेच ध्यास घेतला. त्याच्या कार्याचे क्षेत्र होते गावकूस ते देशार्च सीमा. उपेक्षितांची झोपडी ते दिल्लीचे राष्ट्रपतीभवन समाजातील सर्व थरातील, जातीधर्मातील माणसांना त्यांनी एकत्र आणले.

स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांचा पुरस्कार करत मानवतावादी भूमिका त्यांनी घेतली. खरं म्हणजे स्त्रीही स्वतंत्र झाली होती. परंतु मुलगा–मुलगी हा भेद तीव्र झाला होता म्हणूनच राष्ट्रसंत म्हणतात –

मुलीने सदा लपोनी रहावे।<br>
मुलाने गावी रागरंग पाहावे।<br>
ऐसे ने दृष्ट रिवाज ठेवावे।<br>
न वाटती आम्हा।

राष्ट्रसंत स्त्री–पुरूष विषमतेवर प्रहार करतात. उलट 'स्त्रीच्या तेजावरच पुरूषाचे मोठेपण' आहे असा स्त्रीविषयीचा आत्मविश्वास व्यक्त करतात. या उलट स्त्रिया हया पुरूषांच्या तुलनतेत अगुणात्मकदृष्टया सरस ठरतात – असा विचार मांडतात.

उरे ती तुझ्याहुनी उत्तम वागते।<br>
समाजी उत्तम भाषण देते।<br>
तुलाही शहाणपण शिकवू जाणते।<br>
मग ती मागे कशाने ?

असा पुरूषांना सवाल करतात. एवढेच नाही तर

सर्व सोयी पुरूषांकरिता।<br>
स्त्रियांसाठी सर्व व्यथा।<br>
हे कोण बोलते शास्त्र आता।<br>
द्यावे हाता झुगारोनी

### स्त्री समस्यांची ओळख

राष्ट्रसंत विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या शास्त्र ग्रंथाना स्वहस्ते फेकून द्यावे असा विद्रोही विचार मांडतात. स्त्रियांचे सामर्थ्याचा पुरावा देण्यासाठी राष्ट्रसंत पुरातन काळातील स्त्रियांचा दाखला देतात, तरीही समाजाने स्त्रीला हीन लेखले. तिला स्त्री समान समजले गेले. म्हणूनच या समाजाची या राष्ट्राची दुर्दशा झाली.

आपला झाकोनी दुबळेपणा।

करावी दुसऱ्यांची विटंबना।

हा तो आहे दृष्टपणा।

अमानुष जैसा।।

स्त्रियांमध्ये पुरूषांच्या एवढी पात्रता असूनही आपला दुबळेपणा झाकण्यासाठी पूरूषवर्गाने भेदाचे राजकारण करणे म्हणजे पुरूषी दुटप्पीपणाच होय. स्त्रियांनी शोषणाला बळी पडू नये. त्यांनी स्वतःला अबला न समजता सबला समजावे. या राष्ट्रसंतानी मांडलेल्या विचारातून काळाच्या बरोबर पावले टाकण्यासाठी ते स्त्रीला उद्युक्त करताना दिसतात. स्त्रीने स्वतःचा आत्मिक विकास घडवून आणावा आणि समाजाचा विकास करावा. यासाठी ते मुलींच्या शारीरिक शिक्षणावर भर देतात. एकटी स्त्री जेव्हा पतनाविरूध्द लढण्यासाठी कमी पडते. तेव्हा महिला संघटनांनी वाईट प्रवृत्ती विरूध्द लढा द्यावा. समाजात सुधारणा घडवून आणावी हा स्त्रियांवर टाकलेला त्यांचा विश्वासच होय. त्यांनी नव्या आणि जुन्याचा मेळ घातला.

### *स्त्री विचार :-*

आदर्श समाज निर्मितीसाठी राष्ट्रसंताचे विचार वरवर जरी सौम्य वाटत असले तरी त्यांनी जनतेच्या काळजात शिरून क्रांतिकारी मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न केला. मात्र अजूनही 'स्त्रियांना पुत्रप्राप्तीचे डोहाळे' लागणे बंद झाले नाही. पुरूषांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला नाही. स्त्रीपुरूष शिक्षित झाले तरी अंधश्रध्दा, बुवाबाजी नष्ट झाली नाही. दारू, स्वच्छता, शिक्षण, मजुरी, संडास, आरोग्याचा प्रश्न सुटलेला नाही. त्यासाठी गरज आहे ती या महापुरूषांचे विचार अंगीकृत करण्याची। ते राबविण्याची स्त्री आणि पुरूष यांनी स्वतःत बदल घडवून आणि जोपर्यंतस्त्रियांकडे पाहण्याचा पुरूषी दृष्टीकोन बदलणार नाही तोपर्यंत आदर्श नवसमाज निर्माण होणार नाही! महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन पुरोगामी आहे. कुटुंबातील महत्त्वाचा घटक असणारी स्त्री उपेक्षित कशी राहिली ? तिच्या व्यथा–वेदना कोणत्या ? स्त्री जीवनाच्या समस्यांचे निराकरण करण्याचे कार्य महाराजांनी आपल्या भजनांच्या भाषणांच्या व साहित्याच्या माध्यमातून केले. स्त्रीचे प्रगत जीवन केवळ कुटुंबालाच नव्हे, तर साऱ्या समाजालाही कसे उपयुक्त ठरू शकते, ते म्हणतात –

''स्त्रीलाच भक्ती, स्त्रीलाच ज्ञान। तिलाच संयग शहाणपण।

तिच्यानेच हालती वाटत संपूर्ण । संसार चके।।'

### *समारोप :-*

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शारदेच्या मंदीरातील एक श्रेष्ठ उपासक होते. अल्पशिक्षित असून देखील त्यांनी केलेली विपुल ग्रंथरचना गौरवपूर्ण आहे ग्रामोन्नतीकडून राष्ट्रोन्नतीकडे, राष्ट्रोन्नतीकडून विश्वोन्नतीकडे आणि विश्वोन्नतीकडून विश्वशांतीकडे जाण्याचा मार्ग राष्ट्रसंतांच्या साहित्यातून प्रशस्त झाल्याचे स्पष्ट दिसून येते. 'सबकी भलाई धर्म मेरा।–' हा त्यांचा साहित्याचा 'आत्मधर्म' आहे. श्रमजीवी भुमिपुत्राला सुखी करावे, त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करावा, त्याला पूरोगामी विचारांचा मार्ग दाखवावा, त्याला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळविण्यास सक्षम करावे या व्यापक उद्देशानेच राष्ट्रसंतानी साहित्य रचना केली. भारतीय संस्कृती आणि लोकजीवनाचे समग्र दर्शन घडविणारा हा एक अनन्यसाधारण ग्रंथ म्हणजे ग्रामगीता होय.

'देश हाच देव होय' हा राष्ट्रसंतांच्या जीवनयात्रेंतील 'अमृत विचार' आहे.

'अवघे विश्व माझे घर' या संताच्या व्यापक विचारातच भू–वैकुंठाची कल्पना साकारलेली आहे. एक आदर्श गावच अवघे विश्व होवून जावे.

''या भारतात बंधुभाव नित्य असू दे। दे वराचे असा दे।।''

राष्ट्रसंताच्या समाजजप्रबोधनाची ही दीपशिखा समाजमनाचा गाभारा प्रकाशमान करून सोडील अशी आशा नव्हे खात्री वाटते. राष्ट्रसंताच्या मानवता मूल्यांची ही शिदोरी जीवनाच्या वाटसरूंना पुरून उरणारी आहे.

संदर्भग्रंथ :


1. राष्ट्रसंत तुकडोजी : जीवन व कार्य –संपा. डॉ. सुभाष सावरकर
2. राष्ट्रसंत स्त्रीदर्शन – डॉ. नमिता शेंदरे, ओम प्रकाशन, नागपूर
3. राष्ट्रसंतांचे जीवनदर्शन – सुदाम सावरकर, कला प्रकाशन, अमरावती
4. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ–संपा. प्राचार्य रा तु. भगत




# Certificate of Publication

This is Certify that

Prof./Dr./Mr./Miss. Rashmi Dehapute

has contributed a paper as author / Co-author to title

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार व कार्य

and has got published in Vol. 09 Issue 01 Special Issue 2017. The Editor in Chief and the Editorial Board appreciate the intellectual contribution of the Author / Co-author.

Dr. Subhash Gawai
CHIEF EDITOR

Dr. Rajiv Borkar
GUEST EDITOR

Rameshwar Bargat
ORGANIZING SECRETARY

Publishing Dt.: 28.01.2017

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII | Issue - III | July - September - 2018

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# MARATHI CONTENTS


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राजर्षी शाहू महाराज आणि दलितोद्धार अस्पृश्यतोद्धार<br>**प्रा. डॉ. गौतम ए. शंभरकर** | १-५ |
| २ | राजश्री शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक संबंध: एक अवलोकन<br>**प्रा. डॉ. मोहन राजाराम कातपते** | ६-११ |
| ३ | राजर्षी शाहू महाराजांचे विचार व कार्ये<br>**प्रा. विनोद महादेवराव** | १२-१६ |
| ४ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य<br>**विलास वि. धबाले** | १७-२० |
| ५ | विदर्भातील सामान्य शाळांमधील व विशेष शाळांमधील शारीरिक दृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांच्या शालेय समायोजनाचे शैक्षणिक संपादनाच्या संदर्भात अध्ययन<br>**डॉ. माणिक मारोतराव जोगवे** | २१-२४ |
| ६ | मोठ्या दिलाचा राजा: राजश्री शाहू<br>**लोखंडे चारुशिला उत्तम शशिकला** | २५-२७ |
| ७ | छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक कार्ये<br>**प्रा. जी. एल. सोडनर** | २८-३० |
| ८ | राजश्री शाहू महाराजांची राजकीय कृतीशिलता<br>**प्रा. डॉ. विमल राठोड** | ३१-३४ |
| ९ | राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा<br>**प्रा. डॉ. रमेश वि. मोरे** | ३५-४० |
| १० | पालि साहित्यातील स्त्री पुरूष समानता<br>**डॉ. प्रा. प्रतिभा बी. पर्खिंडे** | ४१-४३ |
| ११ | राजर्षी शाहू महाराज आणि बहुजन समाज<br>**प्रा. किशोर शेषराव चौरे** | ४४-४९ |
| १२ | राजर्षी शाहू महाराज: शैक्षणिक विचार आणि योगदान<br>**प्रशांत वसंतराव चव्हाण** | ५०-५४ |

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# MARATHI CONTENTS



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २५ | राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचे विविध पैलू: व्याप्ती व फलश्रुती<br>**प्रा. डॉ. सुधा मु. खडके (कडू)** | १०४-१०७ |
| २६ | राजर्षी शाहु महाराज का शिक्षा मे योगदान (बहुजन समाज के लिये)<br>**प्रा.डॉ. सुनील जी. नरांजे** | १०८-११२ |
| २७ | राजर्षी शाहू महाराज: शिक्षण व्यवस्थेला नवे वळण देणारा राजा<br>**प्रा. अरविंद संभाजी पाझारे** | ११३-११७ |
| २८ | सामाजिक क्रांतीचे प्रणेते : छत्रपती शाहु महाराज<br>**प्रा. रश्मी राधाकृष्ण दहापुते** | ११८-१२२ |
| २९ | लोकनेता राजा शाहू छत्रपती<br>**प्रा. श्रेया चौधरी** | १२३-१२६ |
| ३० | समतेचे पुरस्कर्ते शाहू महाराज<br>**प्रा. डॉ. गजानन जी. हिवराळे** | १२७-१३० |
| ३१ | राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक कार्य व आजस्थितीतील बदल<br>**दिनेश जारोंडे** | १३१-१३३ |

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL
ISSN 2277-5730

# AJANTA



# २८. सामाजिक क्रांतीचे प्रणेते : छत्रपती शाहु महाराज

**प्रा. रश्मी राधाकृष्ण दहापुते**
मराठी विभागप्रमुख, श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी, जि. अकोला.

## प्रस्तावना

आपल्या देशात राजेशाहीची मोठी परंपरा आहे. भारतातल्या हजारो संस्थानातून छोटे–मोठे राजे आपला कारभार चालवीत असतांना काळाच्या ओघात राजशाही आणि त्या सर्वांची साम्राज्ये लोप पावली. देशातल्या विविध भागात राहणा–या लोकांना आता आठवतसुध्दा नाही की पूर्वी या भागात कोणता राजा राज्य करीत होता.

काही कालत्रयी राजे मात्र याला अपवाद ठरले शेकडो वर्षानंतरही लोक त्यांना राजा म्हणून स्मरतात. बळीराजा, सम्राट अशोक, राजे शिवाजी आणि छत्रपती शाहु महाराज यांची मात्र लोक आजही वारंवार आठवण काढतात याचाच अर्थ समाजजीवनाला आपल्या कर्तृत्वाने भुरळ पाडण्याचे भक्कम सामर्थ्य यांच्याकडे असले पाहिजे याची खात्री पटते.

1894 ते 1922 या आठ्ठावीस वर्षाच्या राज्यकारभारात छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या लोकोध्दारक कामांच्या ऋणातून अजूनही आपल्याला उतराई होता येत नाही एवढे हे महान काम होते. शेती, शिक्षा, कीडा, धर्म यासोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात कांतीकारक कामगिरी करणा–या शाहू महाराजांनी बहुजन समाजातली एकेक माणसं हेरून त्यांचे पैलू पाडले आणि ही नररत्ने समाजाला दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातला तळमळीचा नर्तृत्वगुणही त्यांनीच प्रथम हेरून समाजाला त्यांच्यावर विश्वास टाकायला सांगितले.

## सत्यशोधकी शाहु महाराज

सत्यशोधकी विचारांचे व सार्वजनिक सत्यधर्माचे बिज रोवून रोपटयामध्ये रूपांतर करणारे महात्मा ज्योतिबा फुले आणि त्या वृक्षाच्या सावलीखाली बहुजन समाजाला, विसावा देणारा खरा सत्यशोधकी समाजकांतीकारक म्हणजे 'राजर्षि शाहू महाराज'. सत्यधर्माच्या दृष्टीकोनातून वर्णवर्चस्व अंधश्रध्दा, रूढीप्रामाण्य, पुरोहितशाही, अस्पृश्यता यावर आपल्या प्रत्यक्ष कृतीमधून, राज्यभिषेक झाल्यानंतर राजा म्हणून वटहुकूम काढून त्याविरूध्द अहोरात्र लढा दिलाव ख–या अर्थाने महात्मा ज्योतिबा फुल्यांचा सामाजिक समतेचा विचार प्रज्वलीत केला. अज्ञान, अंधश्रध्दा, अनिष्ठ रूढी व परंपरा, कर्मकांड, मुर्तीपुजा, ब्राम्हणी थोतांड, भ्रामक पोथ्यापुराण यामध्येच आपली सर्व विचारशक्ती खर्ची करून क्षीण झालेल्या बहुजन समाजाला वर काढायचे असेल आणि त्यांना ख–या धर्माची, स्वत्वाची जाणीव करून द्यायची असेल तर सत्यशोधक विचाराची कासच अंगी बाळगली पाहिजे. अशी प्रखर आणि प्रबळ इच्छा राजर्षिंची होती. त्याकरिता त्यांनी स्वतःपासून सुरूवात केली. राजवाडयात पुर्वापार चालत येणारी सत्यनारायणाची पुजा, भट ब्राम्हणाव्दारे संस्थानांमध्ये होत असलेले वेगवेगळे धार्मिक कार्यक्रम व विधी बंद करून त्याऐवजी ख–या सत्यधर्माचे महत्त्व सांगणारे व त्याव्दारे समाजप्रबोधन करणारे कार्यकम आयोजित केले

**स्वावलंबी शिक्षण व्यावसायिक शिक्षण**

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हा राजर्षिंच्या शिक्षण प्रसाराचा मुलमंत्र होता. या शिक्षण प्रसाराचा मुख्य घटक बहुजन समाज ग्रामीण भागामध्ये विखुरला होता. सतत अठरा विश्वे दारिद्रय असणा–या बहुजन समाजाला स्वावलंबी बनवून स्वाभिमानाने जीवन जगायचे असेल तर आर्थिक स्थिती सुधारणे अगत्याचे व त्याकरिता राजर्षिंनी व्यावसायिक शिक्षण देणा–या संस्था उघडून त्याव्दारे निरनिराळया व्यवसायाचे, उद्योगधंदयाचे शास्त्रोक्त शिक्षण देणे सुरू केले. शेती ही परंपरागत पध्दतीने न करता ती आधुनिक पध्दतीने एक उद्योग म्हणून करावी असे राजर्षिंना वाटत होते. शेतीमालावर विविध प्रकिया करून योग्य त्या बाजारपेठेमध्ये त्याची विकी व्हावी "व शेतक–यांना योग्य मोबदला मिळावा म्हणून म्हणून राजर्षिंनी कोल्हापूरला शाहुपुरी ही व्यापारीपेठ निर्माण केली. शेतीव्यवसायाला उद्योगधंद्याची जोड दिली. उद्योग शिक्षणाचे महत्त्व ओळखून राजश्री शाहूंनी सन 1912 साली 'जयसिंगराव घाडगे टेक्नीकल इन्स्टिटयूट' स्थापन केली. या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली. तसेच सुतारकाम, लोहारकाम व ड्रॉईंगमधील कलाकौशल्याचे शिक्षणही देण्यास प्रारंभ केला. व्यापार व उद्योगधंद्यावरच आपल्या राष्ट्राची उन्नती अवलंबून असल्यामुळे राष्ट्राचा जो मुख्य आधार त्या शेतकरी समााजाने व्यापार धंदे व उच्च प्रतीचे उद्योग केले पाहिजे अशी राजर्षिंची प्रखर इच्छा होती.

मजूर व कारागिर यांना नवनवीन कसब तांत्रिक ज्ञान व विज्ञान शिकण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे असे त्यांनी सांगितले.

**स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ**

छत्रपतींनी पुरूषांच्याबरोबरीने स्त्रीशिक्षणासाठी प्रयत्न केले. शिक्षण घेणा–या मुलांना फी माफी व शिष्यवृत्या चालू केल्या. त्यामुळे स्त्रियांची प्रगती होण्यास मदत झाली. कृष्णाबाई केळकर या विद्यार्थीनीला तिची गुणवत्ता पाहून मुंबईच्या ग्रॅन्ट मेडीकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी पाठविले. नंतर वैद्यकीय पारंगत होण्यास इंग्लंडला पाठविले. राजाराम महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणा–या विद्यार्थीनींना राजर्षीनी फी माफी दिली होती.

**सामाजिक सुधारणा**

हिंदू धर्मात सामाजिक विषमता मोठया प्रमाणात होती. याचा राष्ट्रीय ऐक्यावर मोठा परिणाम होत होता. तेव्हा शाहू राजांनी जातीयतेचे उच्चाटन करण्याचे कार्य हाती घेतले. समाजातील जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी विविध मार्गांचा अवलंब केला. स्वतःच्या कृतीने उदाहरण घालून दिले 'आधी केले मग सांगितले' असा कृतीशील राजा होता.

26 जुलै 1918 रोजी महाराजांनी आपल्या वाढदिवसाची एक अनोखी भेट प्रजेला दिली. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी यादिवशी जाहीरनामा प्रसिध्द केला. 1 ऑगष्ट 1918 रोजी गुन्हेगार गणल्या गेलेल्या जातीची हजेरी पध्दत बंद केली. 18 ऑगष्ट 1918 रोजी 'महार वतन' रद्द व्हावे म्हणून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा दिली. महाराजांनी आपल्या अधिकारात लगेच ही गोष्ट केली. जातियता, सामाजिक विषमता व अनिष्ट सनातनी रूढीविरूध्द कांती घडवून आणून नवसमाज निर्मिण्याचे ऐतिहासिक कार्य राजर्षि शाहू महाराजांनी केले.

या सर्व समाजकांतीकारक कार्याची पावती उत्तरप्रदेशातील कानपूरच्या कुर्मी समाजाने त्यांनी दिली. 21 एप्रिल 1919 रोजी कानपूरला भरलेल्या कुर्मी क्षत्रिय परिषदेत महाराजांना 'राजर्षी' ही पदवी देण्यात आली.

2. अस्पृश्यांना निर्मूलन : आमच्या राज्यात कोणाही इसमाला जनावराप्रमाणे न वागवता मनुष्य प्राण्याप्रमाणे वागवावे.
3. कृषिविषयक : आपल्या देशातील लोकांना जुन्या शेती पध्दतीऐवजी सुधारलेल्या शेतीशास्त्रांचा आणि अवजारांचा अवलंब केला पाहिजे.
4. कर्मजंजाळातून हा प्राचीन समाज बाहेर पडला पाहिजे.

**समारोप**

अशात–हेने विज्ञाननिष्ठ, बुध्दीप्रामाण्यवादी, धर्मनिरपेक्ष, न्यायप्रविष्ट, समताधिष्ठित, विवेकप्रधान भारतीय समाज़ाची 21व्या शतकाची वाटचाल पाहतांना त्याची सुरूवात महाराजांनीच केल्याचे जाणवते. परंतु महाराष्ट्र राज्याची व आपल्या राष्ट्राची सद्यःस्थिती पाहता बहुजन समाजाची आज तब्बल 80 वर्षे झाल्यानंतरसुध्दा जी अवस्था दिसते. ती पाहुन मन हेलावून जाते. ह्रदयाला पाझर फुटतो, विवकेश्क्ती, कयशक्ती नष्ट करणारे शिक्षण, वाढती बेरोजगारी, परावलंबी माणसं, स्वयंपूर्ण व साधनसामुग्रीयुक्त खेडयाऐवजी परावलंबी, ओस पडत असलेली खेडी दृष्टीस पडत आहेत. त्यामधील शेतकरी शेतमजूर न्यायासाठी संघर्ष करत आहे.

शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायाची दिंडी आपण निष्ठापूर्वक आपल्या खांद्यावर घेवून खेडयातील माणूस स्वावलंबी बनविणे, स्वयंपूर्ण खेडे निर्माण करणे, व्यावसायिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून बेरोजगारीचे निर्मूलन करणे, बहुजनांनी बहुजनांच्या हितासाठी झटणे, भेदाभेद नष्ट करणे व सामाजिक न्यायासाठी सा–या दलित पिडीतांनी समतेच्या एकाच दिंडीखाली वाटचाल करून शाहू महाराजांचे पुरोगामी व कृतीशील विचार आचरणात आणणे, ही देशाची आजची गरज आहे.

**संदर्भ पुस्तके**

1. सनातनी ब्राम्हणी दर्प आणि शाहू छत्रपती – पुरूषोत्तम आवारे पाटील
2. सामाजिक कांतीचा प्रणेता – राजर्षि शाहू छत्रपति – जीवन व कार्य –प्रकाशक – माणिकराव पोटे
3. मंडल आयोग – काल, आज आणि उद्या ॲड. विष्णू ढोबळे

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

**Peer Reviewed Refered and UGC Listed Journal**


An International Multidisciplinary Quarterly Research Journal

VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
ISSN 2277 - 5730


# AJANTA

**Impact Factor - 5.5** (www.sjifactor.com)

Is Hereby Awarding This Certificate To

प्रा. रश्मी राधाकृष्ण दहापुते

An Recognation of the Publication of the Paper Entitled

सामाजिक क्रांतीचे प्रणेते : छत्रपती शाहु महाराज

Editor : Vinay S. Hatole


Ajanta Prakashan
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No.: 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

MAH/MUL/03051/2012
ISSN- 2319 9318

# VIDYAWARTA ®

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका
विद्यावार्ता

www.vidyawarta.com

Special Issue
ISSN - 2319 9318
(Vol. II) Aug. 2019
International Multilingual Refereed Research Journal
Available Online

An Inter-Disciplinary
## NATIONAL CONFERENCE
On
# Role Of Higher Education In Making India Superpower

21st August 2019

Organized By
Department of Physical Education
and I.Q.A.C.

SHUK

PEFI

| | | |
|---|---|---|
| 85) | THE EFFECTIVE ROLE OF SPORTS MANAGEMENT IN HIGH SCHOOL SPORTS<br>**VIKAS ANIL WANKHADE** | 376 |
| 86) | IMPORTANT BENEFITS OF SPORTS FOR YOUTH DEVELOPMENT<br>**PROF. SARJERAO WAGH** | 379 |
| 87) | YOGA: AN ELIXIR FOR HUMAN LIFE<br>**DR. USHA P. YAUL** | 383 |
| 88) | NECESSITY OF PHYSICAL EDUCATION AND SPORTS IN THE PRESENT SENERIO...<br>**DR. VASANT ZENDE, PROF. MADHUKAR WAKALE** | 387 |
| 89) | ROLE OF INFORMATION AND COMMUNICATION TECHNOLOGIES....<br>**DR. BAPPSAHEB MASKE** | 390 |
| 90) | PREKSHA MEDITATION A PART OF YOGA FOR HEALTHY LIFE STYLE<br>**DR. NETAJI MULEY, SHRINIVAS MOTIYELE** | 394 |
| 91) | SUMMER FITNESS TRAINING PROGRAMMES ON STRENGTH<br>**DR. MEENA N. PAWAR** | 398 |
| 92) | SCOPE OF RESEARCH IN YOGA<br>**PROF. LIMBAJI K. PRATALE** | 402 |
| 93) | THE MOTOR NERVE CONDUCTION AND VELOCITY OF ULNAR AND......<br>**DR. SANDEEP JAGTAP** | 406 |
| 94) | उत्कृष्ठ ग्रंथालय आणि उत्कृष्ठ इंटरनेट वाचक अवार्ड रेणुका कॉलेज ग्रंथालयातील..<br>डॉ. रमणिक एस. लेनगुरे | 410 |
| 95) | बालगृहातील एक पालक, द्विपालक, अनाथ आणि अन्य किशोरवीन मुलांच्या......<br>**डॉ. अनुरागीणी रमेशराव बोके** | 415 |
| 96) | खेल के माध्यम से बच्चों और युवाओं का स्वास्थ्य विकास<br>**प्रशांत चारजन** | 418 |
| 97) | युवकांच्या विकासात योग साधनेचे योगदान<br>**प्रा. उत्तम रामचंद्र देउळकर** | 421 |
| 98) | उच्च शिक्षणातील ई लर्निंगचे महत्त्व<br>**डॉ. डि.के. राठोड** | 425 |
| 99) | युवकांच्या विकासामध्ये शारीरिक शिक्षणं आणि खेळांची भूमिका<br>**डॉ. किरण व. मोगरकर** | 428 |
| 100) | साने गुरूजीं : भारतीय संस्कृतीचे उपासक<br>**प्रा.रश्मी दहापुते** | 433 |
| 101) | सहकारी बँकासमोरील समस्यां आणि उपाय<br>**प्रा. तानाजी सिताराम नरवाडे** | 437 |

100

# साने गुरूजीं : भारतीय संस्कृतीचे उपासक

**प्रा.रश्मी दहापुते**
मराठी विभागप्रमुख
श्री गणेश कला महाविद्यालय शिवणी–कुंभारी, जि.अकोला

पूज्य सानेगुरूजी म्हणजे भारतीय संस्कृतीचे उपासक, एक प्रेमळ सोज्वळ मूर्ती. 'खरा तो एकची धर्म। जगाला प्रेम अर्पावे।' या एका ओळीने त्यांच्या अंतःकरणातील प्रेमस्वरूपाची ओळख होते. संपूर्ण जगाला प्रेमाच्या भा ेची ओळख करून दिली. सा–या धर्माचे सार 'जगाला प्रेम अर्पावे' हेच आहे. यावर साने गुरूजींची अविचल श्रध्दा होती.

साने गुरूजी स्वतःच सांगत की, ''मी जीवनाचा एक नम्र उपासक आहे. सभोवतालचा सारा संसार सुखी नि समृध्द व्हावा, ज्ञानविज्ञान संपन्न नि कलामय व्हावा, सामर्थ्यसंपन्न नि प्रेममय व्हावा हिच एक मला तळमळ आहे. माझे लिहिणे वा बोलणे, माझा विचार वा माझी प्रार्थना या एकाच ध्येयासाठी असतात.'' सानेगुरूजींचे साहित्य म्हणजे प्रबोधनाचा गजर, माणूसकीचा जागर आणि कारूण्याचा आगर होय.

**स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली**

गुरूजी हे जसे हाडाचे शिक्षक होते, तसे हाडाचे कार्यकर्तेही होते.

''मंगल मंगल त्रिवार मंगल
पावन दिन धन्य असे।
भारत माझा स्वतंत्र झाला
जय बोला जय बोलाहो।

गुरूजींच्या स्वातंत्र्याच्या हया गीताने सगळीकडे चैतन्याचे वारे संचारले. १३मार्च१९३० यादिवशी दांडीयात्रा सुरू झाली. एका उदात्त हेतूने माणसे दांडीयात्रेत सामील झाली होती त्यांनीसुध्दा सत्याग्रहात उडी घेतली. गुरूजींनी ोतक–यांचा लढा संघटित केला. 'तापी नदीमध्ये जलसमाधी घेईन' ही प्रतिज्ञा करून अमळनेरच्या गिरणी कामगारांचा प्रश्न सोडवला. आपल्या व्याख्यानातून शिबिरांतून, लेखनातुन स्वातत्र्याचे प्रबोधन करीत होते.

**सानेगुरूजी–संत परंपरेतील महापुरू ा**

सानेगुरूजी हे तत्वज्ञानाचे गाढे अभ्यासक. गीता प्रवचनांमधून भगवान श्रीकृ णाचा जीवनवेदांत विनोबाजींनी सांगितला आणि गुरूजींना प्रासादिक ब्दात तो लिहून काढला. साहित्यातील प्रसार, ओज आणि माधुर्य या तीनही गुणांचे एकत्रीकरण झाले. साने गुरूजी श्रोते म्हणून ती प्रवचने ऐकत आणि रात्री लिहून काढत. प्रसंगी विनांबाजींना टिपणे दाखवीत. याचेच पुढे 'गीताप्रवचने–' हा मराठीतील अव्दितिय ग्रंथ तयार झाला.

**भारतीय संस्कृती – संस्कृती चिंतनाचा ज्ञानदीप.** साने गुरूजी यांनी 'भारतीय संस्कृती' हा महान ग्रंथ लिहिला. भारतीय संस्कृतीची परंपरा, मूल्ये, तात्विक चिंतन असणारे पुस्तक म्हणजे 'संस्कृती चिंतनाचा ज्ञानदीप' म्हणावा लागेल

गुरूजीनी संस्कृती ही संकल्पना अत्यंत स्प टपणे आणि सोप्या पध्दतीत मांडली आहे. गुरूजी म्हणतात, ''संस्कृती म्हणजे सहानुभूती आपण स्वतः वाढत राहून दुस–याकडून सहानुभूती ठेवणे, त्यांचा हेवादावा, व्दे ा, मत्सर न

करणे, त्यांचे अशुभ व अकल्याण न चिंतणे, त्यांच्याकबद्दल  ुभेच्छा बाळगणे व त्यांना आपले समजून मदत करणे, यालाच संस्कृती असे म्हणतात. चराचरावर प्रेम करू पाहणारी, कृतज्ञता प्रकट करणारी ही भारतीय संस्कृती आहे.

**संस्कृती म्हणजे संयम, सहृदयता**

'सर्वेपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।'

अशी आहे भारतीय संस्कृती, रविन्द्रनाथ म्हणतात ''मनु  याबद्दल प्रेम असल्याशिवाय कोठली संस्कृती? जेव्हा मानव निर्दय होतात, तेव्हा संस्कृती धुळीस मिळते. स्वातंत्र्यप्राप्ती, न्याय, समता यांचे खून करणे. म्हणजे संस्कृती न  ट करणे. मानवाला सुसंस्कृत व्हायचे असेल तर मानवाने संयम राखला पाहिजे.

**भारतीय संस्कृती बुध्दीजीवी संस्कृती**

भारतीय संस्कृतीला ज्ञानाहून दुसरे काहीही पवित्र वाटत नाही. ज्ञानोपासकाबद्दल भारतीय संस्कृतीला नितांत आदर आहे. भारतीय संस्कृती ही बुध्दिप्रधान संस्कृती आहे. निर्मलहृदयात बुध्दींचा प्रकाश असतो. निर्मळ हृदय व निर्मल बुध्दी यांच्या बळावर भारतीय संस्कृती उभारण्यात आली आहे.

साने गुरूजी म्हणतात : ''भारतीय संस्कृती म्हणताच सागर व अंबर या दोन महान वस्तू माझ्या डोळयासमोर उभ्या राहतात. त्याग, संयम, वैराग्य, सेवा, प्रेम, ज्ञान, विवके या गो  टी आठवतात. भारतीय संस्कृती म्हणजे अनंताकडे जाणे, विकारातून विवेकाकडे जाणे, गोंधळातून व्यवस्थेकडे जाणे. भारतीय संस्कृती म्हणजे. सर्व जातींचा मेळ, सर्व ज्ञान—विज्ञानांचा मेळ. सर्व मानवजातीचा मेळ मांगल्याकडे घेवून जाऊ पाहणारी.''

**तत्वज्ञ साने गुरूजी**

साने गुरूजींनी भारतीय संस्कृतीचा अत्यंत सुक्ष्मपणे आणि डोळसपणे अभ्यास केला आणि डोळसपणाने ती लोकांसमोर मांडली. भारतीय संस्कृतीमध्ये अंधश्रध्देला वाव नाही. विचारांचाच महिमा सर्वत्र दिसून येईल. भारतीय संस्कृतीचा 'वेद' हा पाया मानला जातो. वेद  ब्दाचा अर्थच ज्ञान असा आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा पाया आहे. ज्ञानावर उभी राहिलेली ही भव्य संस्कृती आहे, गुरूजी वेदांचाही नवा अर्थ सांगतात. जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे वेद आहे. प्राचीन ऋ  ीमुनी ज्ञानाची साधना करण्यासाठी तपश्चर्या करीत. ज्ञान मागण्यासाठी वाटेल त्याच्याकडे जात. 'सद्‌गुरू'चे मानवी जीवनात असलेले महत्व:ज्ञानदानाच्या क्षेत्रात 'सद्‌गुरू'ही संकल्पना केवढी पवित्र आहे. सदगुरू हे व्यापक, नदीसारखे पवित्र सुर्यासारखे तेजस्वी. गुरूजी म्हणतात, भारतीय संस्कृतीत गुरूभक्ती म्हणजे अत्यंत मधुर असे काव्य आहे ज्ञानदेवांनी सदगुरूना 'प्रज्ञाप्रभात सूर्या म्हणून गौरविले आहे. सानेगुरूजी सद्‌गुरूंचा महिमा स्प  ट करतांना म्हणतात, 'गुरू त्या त्या ज्ञान प्रांतात किंवा त्या त्या कलेत आपणास पुढे पुढे नेतो. परंतु सद्‌गुरू जीवनाचीही कला दाखविते.'' 'अध्यात्मविद्या विद्यानाम' असे गीता सांगते. जीवन सुंदर करणे, स्वतःचे जीवन नि  काम, निर्दो  । करणे ही सर्वात थोर विद्या.

**साने गुरूजींचे तत्वचिंतन**

साने गुरूजी हे तत्वचिंतक होते. भारतीय ऋ  ीमुनींनी दिलेल्या तत्वमूल्यांचे व वेद उपनि  ादांचे अभ्यासक होते. भारतीय संस्कृतीचे उपासक होते. समाज, धर्म, माणूस आणि संस्कृती यांचा समन्वय साधणारे विचारवंत होते.

**१) स्वातंत्र्य व समता**

'स्वप्न आणि सत्य' या पुस्तकात 'स्वातंत्र्य आणि स्वराज्य' हा लेख त्यांनी लिहिला आहे कृत्यात ते म्हणतात—''स्वातंत्र्य म्हणजे सर्वांच्या विकासाला संधी. स्वातंत्र्य म्हणजे सुखसंपन्न होण्याचे साधन. अत:पर या देशात कोणी दु:खीक  टी नको. सर्वांना स्वाभिमानाने जगता येवू दे. विकासाच्या आड दारिद्रय येता कामा नये. स्वच्छता, आरोग्य येऊ दे. अन्याय जावू दे. उपासमार जाऊ दे. नको लाचलुचपत, नको वशिले, नको कोणी उन्मन्त. सर्वांची सरळ मान होवू दे. सर्वांना वाव असू दे.

सर्वांना अन्न, वस्त्र, मिळो, राहायला साधे–सुधे घरदार असो. जमीन नसेल त्याला जमिन. ते स्वत:च कसायला तयार असले म्हणजे झाले.''

गुरूजी म्हणत जोपर्यत मानव मानवाला मानवतेने वागवायला तयार नाही, तोपर्यत स्वातंत्र्याचा अर्थ आम्हाला कळला नाही. परकीयांची सत्ता झुगारायला आपण अधीर असतो, परंतु आपल्याच बांधवावर गुलामगिरी लादीत असतो.

**साने गुरूजींचे–स्त्री–स्वातंत्र्यविचार**

साने गुरूजी यांचे स्त्रीवि यक विचार अतिशय आधुनिक होते. ते स्त्री स्वातंत्र्य पुरस्कर्ते होते ते म्हणतात, ''भारतात स्त्रियाना स्वातंत्र्य हवे. हिंदु भगिनींचे व मुस्लिम भगिनीचे घुंगट जायला हवेत. मुसलमानांनीही एकापेक्षा अधिक बायका करू नयेत. स्त्री मग ती कोणत्याही धर्माची असो, तिला आपण मुक्त झालो असे वाटले पाहिजे हिंदू कोडबील, मुस्लीमकोडबील, असे न करता सर्वांना बंधनकारक असा मानवतेचा कायदा करा.

सामाजिक विकृतीवर अचूक बोट ठेवून ती विकृती घालविण्यासाठी सानेगुरूजींची लेखणी अविरतपणे लिहित राहिली. धर्माच्या संकल्पनेवर बोलतांना जातीयता, वि मता, सामाजिक चारित्र्य, श्रमशक्ती, भांडवलशाही यांबरोबरच स्त्रीमुक्तीची विचार त्यांनी समर्थपणे मांडला. 'स्वप्न आणि सत्य' या पुस्तकात सामाजिक समतेचा विचार मांडताना ते लिहितात :

''मुलगा पित्याच्या इस्टेटीत वारस असतो. मुलगी का नसावी? हिंदु स्त्रियांचा विचार केला तर लक्षात येते की त्या गायीप्रमाणे बांधल्या गेल्या आहेत.

**साने यांचे संतविचार आणि चिंतन**

महारा ट्रही संताची भूमी आहे. या भूमीत अनेक संतांनी अवतार घेवून मानवी कल्याण केले. संत हे महारा ट्राच्या सांस्कृतिक जिवनाचे शिल्पकार आहेत. विचारांना आचाराची जोड देऊन समाजमन घडविणारे खरे लोकशिक्षक आहेत. साने गुरूजीवर लहानपणापासून संताच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. लहानपणी आईने संताची वचने पाठ करून घेतली होती. ज्ञानदेवाची ज्ञानेश्वरी, तुकोबांची गाथा व समर्थांच्या दासबोधवर त्यांचे जीवन पोसत होते. संतसाहित्याच्या संस्कारातून व्यक्तिमत्व घडले होते.

**साने गुरूजींचे–'चंद्रभागेच्या वाळवंटी**

साने गुरूजींच्या व्याख्यानात, लिखाणात ठायीठायी संताची वचने पेरली जात होती ज्ञानोबा ते विनोबा हया संत–परंपरेला अभिमानाने मिरवीत गुरूजी संतविचारांचेच प्रबोधन घडवित होते. 'चंद्रभागेच्या वाळवंटी'' या पुस्तकात संताच्या साहित्यावि यी आणि कार्यावि यी उत्कट चिंतन घडविले आहे. श्रीक्षेत्र पंढरपूरचे विठठल मंदिर हरिजंनांना खुले व्हावे म्हणून गुरूजींनी १९४७साली आमरण उपो ण केले. त्यावेळी संपूर्ण महारा ट्रभर हिंडून संताचा मानवधर्म सर्वांना समजावून सांगितला.

**चार पुरू ार्थ**

भारतीय संस्कृती ही पुरू ार्थप्रधान आहे. भारतीय तत्वज्ञानाचे चार पुरू ार्थ सागितले आहेत. पुरू ार्थाने जीवन उत्तम करता येते. पुरू ार्थाने जीवनाचे ध्येय गाठायचे असते.

साने गुरूजींनी पुरू ार्थांचे चिंतन घडविताना सामान्य माणूस डोळयासमोर ठेवला आहे. त्याला समजेल इतक्या सोप्या ब्दात पुरू ार्थांची संकल्पना मांडली आहे. गुरूजी म्हणतात धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरू ार्थ आहेत. या संसारात प्रयत्न करून मिळविण्यासारख्या चार वस्तू आहेत पुरू ार्थ म्हणजे पुरू ाने प्राप्त करून घेण्यासारख्या गो टी.

संपत्ती मिळवायची आहे. मिळव परंतू उत्तम व्यवहाराने मिळव. कोणाला फसवू नकोस, लुबाडू नकोस. चोरीमारी करू नकोस फार फायदा घेवू नये. फार व्याज घेवू नकोस दुस—याचे घरे पाडून स्वतःचा माडया नको बांधू.

असे धर्म सांगतो. धर्म, अर्थ, काम मोक्ष यातील अर्थ आणि काम यांच्या आरंभी धर्म आहे व अंती मोक्ष आहे.

**समारोप**

**मृत्यूचे काव्य** – 'मृत्युचे काव्य' हा सुंदर लेख त्यांनी लिहिला. त्यात ते म्हणतात—''भारतीयं संस्कृतीत मृत्युवि यी, ठिकठिकणी जे विचार आहेत ते किती गोड आहेत, किती भव्य आहेत. मृत्युती भी णता भारतीय संस्कृतीत नाही. मृत्यु म्हणजे जीवनाच्या वृक्षाला लागलेले गोड फळ. मृत्यु हे ईश्वराचेच एक स्वरूप.

गुरूजी आपले सर्वस्व देऊन गेले. त्यांच्या विचारांची, कार्याची किर्ती ठेवून गेले. कसे जगावे, कसे मरावे आणि कसे उरावे. याचा महान आदर्श म्हणजे साने गुरूजी.

**संदर्भग्रंथ** –

१) भारतीय संस्कृति—साने गुरूजी
२) यामची आई—साने गरूजी
३) चंद्रभागेच्या वाळवंटी—साने गुरूजी
४) संस्कृति पूजन—पांडुरंगशास्त्री आठवले
५) गीता प्रवचने—विनोबा
६) जीवनयोगी साने गुरूजी—डॉ.रामचंद्र देखणे
७) साने गुरूजी—यदुनाथ थत्ते

संपत्ती मिळवायची आहे. मिळव परंतू उत्तम व्यवहाराने मिळव. कोणाला फसवू नकोस, लुबाडू नकोस. चोरीमारी करू नकोस फार फायदा घेवू नये. फार व्याज घेवू नकोस दुस—याचे घरे पाडून स्वत:चा माडया नको बांधू.

असे धर्म सांगतो. धर्म, अर्थ, काम मोक्ष यातील अर्थ आणि काम यांच्या आरंभी धर्म आहे व अंती मोक्ष आहे.

**समारोप**

मृत्यूचे काव्य — 'मृत्युचे काव्य' हा सुंदर लेख त्यांनी लिहिला. त्यात ते म्हणतात—''भारतीयं संस्कृतीत मृत्युवि यी, ठिकठिकणी जे विचार आहेत ते किती गोड आहेत, किती भव्य आहेत. मृत्युती भी णता भारतीय संस्कृतीतं नाही. मृत्यु म्हणजे जीवनाच्या वृक्षाला लागलेले गोड फळ. मृत्यु हे ईश्वराचेच एक स्वरूप.

गुरूजी आपले सर्वस्व देऊन गेले. त्यांच्या विचारांची, कार्याची किर्ती ठेवून गेले. कसे जगावे, कसे मरावे आणि कसे उरावे. याचा महान आदर्श म्हणजे साने गुरूजी.

**संदर्भग्रंथ —**

१) भारतीय संस्कृति—साने गुरूजी
२) यामची आई—साने गरूजी
३) चंद्रभागेच्या वाळवंटी—साने गुरूजी
४) संस्कृति पूजन—पांडुरंगशास्त्री आठवले
५) गीता प्रवचने—विनोबा
६) जीवनयोगी साने गुरूजी—डॉ.रामचंद्र देखणे
७) साने गुरूजी—यदुनाथ थत्ते

S. N. Arts & U. K. Commerce College, Akola
Saraswati Kala Mahavidyalaya, Dahihanda, Tq. Dist. Akola
Shri. Ganesh Kala Mahavidyalaya, Kumbhari, Akola

**Department of Physical Education & IQAC**
**Collaboration With**
**Physical Education Foundation of India**
**Organized**
**An Inter Disciplinary National Conference on**

# Role Of Higher Education In Making India Superpower

**21st August 2019**

Sr. No.______

# CERTIFICATE

This is to certify that Dr./Prof./Mr./Mrs./Ms. Prof. Rashmi Dahapute.
of श्री गणेश कला महाविद्यालय सिवणी - कुंभारी - अकोला. has participated in the One Day Inter-Disciplinary National Conference On "**Role of Higher Education In Making India Superpower**". He / She has participated as Resource Person / Chairperson/ Co-Chairperson/ Delegate / Research Scholar. He / She has presented / published a paper Entitled साने गुरुजी : भारतीय संस्कृतीचे उपासक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Dr. Piyush Jain**<br>Secretary<br>Physical Education Foundation of India (New Delhi) | **Dr. Nitin W. Deulkar**<br>Convener | **Dr. Sagar P. Narkhede**<br>Organizing Secretary | **Dr. Santosh P. Tayade**<br>Joint Secretary | **Dr. Jayant P. Bobade**<br>Pricinpal<br>S. N. Arts, & U. K. Commerce College, Akola |

▪ **AmrutManthan** Bhartiy Swatantryachi 75 Vars

▪ प्रकाशक । गोविंद मुक्कनवार
गुरुमाऊली प्रकाशन,
विकास नगर, एल.आय.सी.
कार्यालयाच्या पाठीमागे, उदगीर
जि. लातूर - ४१३५१७
मो. ९६२३१२७६२९
gurumauliudgir01@gmail.com

▪ © डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील
स्वामीविवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद ता. अहम
जि. लातूर

▪ मुखपृष्ठ चंद्रकांत मादळे
▪ प्रथमावृत्ती । २६ जानेवारी २०२२
▪ किंमत : २००/-
▪ **ISBN :** 978-81-955116-4-8

टीप : सदरील पुस्तकातील लेखात व्यक्त झालेल्या मतांशी संप
सहमत असतीलच असे नाही.

## ❖ अनुक्रमणिका ❖


**अ) स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय स्थित्यंतरे**

१. भारतीय संविधान : स्वातंत्र्य आंदोलनाचे अपत्य - प्रा.डॉ.प्रभाकर गणपतराव जाधव ... १

२. स्वातंत्र्य चळवळीच्या पार्श्वभूमीतून उगम पावलेले राष्ट्रीय व वैचारिक नेतृत्व : यशवंतराव चव्हाण - प्रा. डॉ. पंडित महादेव लावंड ... २

३. केंद्र - राज्य संबंधातील वित्त आयोगाची भूमिका (विशेष संदर्भ १५ वा वित्त आयोग) - प्रा डॉ. विष्णूकांत पंडितराव शेळके ... ३

४. एकविसावे शतक आणि गांधीवाद : एक चिंतन - प्रा. डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील. ... ४

५. भारतीय राजकारणातील प्रभावशाली स्त्री : के. आर. गौरी अम्मा - प्रा. डॉ. रजनी अ. बोरोळे.

६. भारतीय राजकारणातील महिलांचे योगदान - प्रा. डॉ. शाम भागवत शिंदे.

**ब) साहित्य व संस्कृती**

१. महाराष्ट्र, कर्नाटक सीमावर्ती भागातील लोकगीतांमधील शब्द वैभव - श्रीमती सुनिता काळे

२. भारतीय स्वातंत्र्य, जागतीकिकरण आणि मराठी आदिवासी कविता - प्रा. डॉ. शिवाजी पिराजी जगतवाड

३. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबऱ्या आणि मराठी चित्रपट - प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी.

४. दलित साहित्यातील शिलेदार : योगीराज वाघमारे - प्रा. प्रशांत कांबळे.

५. भारतीय समाजजीवनातील स्त्रीचे स्थान आणि मराठी साहित्यातील चित्रण - प्रा. रश्मी दहापुते. ... १२३

६. आधुनिक कवितेतील सामाजिक वदल - प्रा. डॉ. देविदास पांडुरंग खोडेवाड. ... १४३

**क) संकीर्ण**

१. भारतीय स्वातंर्त्याच्या ७५ वर्षातील उच्च शिक्षणातील स्थित्यंतरे - प्रा. डॉ. परमेश्वर अभंगराव पाटील. ... १५४

२. भारतीय अंतराळवीर : एक दृष्टिक्षेप - प्रा. डॉ. शिवराज पाटील. ... १६८

३. भारतीय शेतकरी आणि कृषी कायदा - प्रा. डॉ. एस. पी. घायाळ. ... १८१

४. भारत आणि टोकियो ऑलिंपिक २०२० - प्रा. डॉ. गोविंद काळे. ... १९१

५. ऑलिम्पिकमध्ये भारत - प्रा. डॉ. भास्कर माने. ... २०७

६. The Impact of Ghandhian Ideology in Narayan's Waiting for the Mahatma - Prof. Dr. Mantha Padmabandhavi Prakashrao. ... २२१

७. India's Foreign Policy after 1991 and it's Challenges - Prof. Dr. Bodake Panchafula Ramram. ... २२७

जीवन त्यांनी जवळून पाहिले आणि अनुभवले आहे. एक लेखक व एक व्यक्ती म्हणून तो जे अनुभवतो तेच तो वेगवेगळ्या साहित्य प्रकारांच्या आधारे अभिव्यक्त करत जातो. परिणामी साठोत्तरी नंतरचा मराठवाडा समजून घेण्यासाठी योगीराज वाघमारे यांचे साहित्य निश्चितच उपयोगी ठरेल, यात शंका नाही. त्यांचे साहित्य केवळ एका लेखकाची कलाकृती नसून सवंध समूहमनाची प्रातिनिधिक शब्दानुभुती आहे, असे म्हटल्यास वावगे ठरत नाही.

**संदर्भ सूची :**


१. दलित साहित्य उद्गम आणि विकास - भालचंद्र फडके - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर - प्र. आ. १९९८ - पृ. २१३.
२. https://marathivishwakosh.org
३. तत्रैव.
४. सम्यक लेखक : योगीराज वाघमारे - (संपा) डॉ. सारीपुत्र तुपेरे - एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर - प्र. आ. १ ऑक्टो. २०१२ - पृ. ६५.
५. नामस्मरणाचा रोग - लेख - पु. ल. देशपांडे - म. फुले गौरव ग्रंथ भाग १ - संपा. हरी नरके, य. दि. फडके - महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन, मुंबई - सुधारित द्वितीय आवृत्ती २८ नोव्हेंबर १९९१ - ७०८-७०९.
६. वेगड - योगीराज माने - हर्ष प्रकाशन, उस्मानावाद - प्र. आ. १९८० - पृ. २६.




# ५. 'भारतीय समाजजीवनातील स्त्रीचे स्थान आणि मराठी साहित्यातील चित्रण'


प्रा. रश्मी दहापुते,
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
श्री. गणेश कला महाविद्यालय, कुंभारी,
जि. आकोला.


भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव यावर्षी आपण साजरा करीत आहोत. जगात ज्यांच्या साम्राज्याचा सूर्य कधीच मावळत नव्हता अशा बलाढ्य इंग्रजी साम्राज्याला अहिंसेच्या मार्गाने देश सोडून निघून जाण्यास भारतीय जनतेने भाग पाडले. या स्वातंत्र्यसंग्रामात अर्थातच स्त्रियांचा वाटा निर्णायक आणि तितकाच मोलाचा होता. स्वातंत्र्यवीरांच्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी या विरांगणानी हसतमुखाने स्वतःच्या खांद्यावर पेलली. ज्यांच्या नावाचा कुठेही उल्लेख नाही अशा असंख्य स्त्रियांचे बलिदान नक्कीच वादातीत आहे. स्त्री शिक्षित असो वा अशिक्षित त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपापले योगदान दिले आहे. समाजकारणात अग्रणी असलेल्या सुधारकांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यात सावित्रीबाई फुले यांनी बरोबरीने सहकार्य केले. महात्मा गांधी यांच्या कार्यात कस्तुरबा गांधी सतत सहभागी व्हायच्या. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक कार्यात माता रमाई सतत सावली सारख्या पाठीशी उभ्या राहयच्या. वरील उदाहरणे स्त्रियांनी दिलेल्या योगदानाची प्रेरक कथा सांगणाऱ्या आहेत. याशिवाय ज्यांची कुठेही नोंद नाही अशा असंख्य स्त्रियांनी शेतीशी निगडित कार्यात सतत आपले योगदान दिलेले आहे. आजही कृषी

संस्कृतीचा खूप सारा भार स्त्रिया समर्थपणे आपल्या खांद्यावर वाहतात, हे नाकारता येत नाही.

स्वातंत्र्यानंतर देशाची घडी हळूहळू बसावयास सुरूवात झाली. जुन्या कालबाह्य गोष्टी बाजूला पडून नवीन विचार, आचार, व्यवहार प्रचलित होऊ लागले. आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक जीवन बदलू लागले. प्रगतीच्या मुख्य मार्गावर येऊ लागले. राहणीमान, खानपान बदलले. जगाच्या तुलनेत आपण कुठेही कमी नाही हे स्पष्टपणे सांगता येईल इतकी प्रगती भारताने केली. शहरे बदलली. गावे विकसित होऊ लागली. शिक्षण, व्यापार यात प्रगती झाली. कायद्याचे राज्य आले. पण या सर्व बदलात एक बाब मात्र आहे तशीच राहिली ती म्हणजे भारतीय स्त्रीची सामाजिक स्थिती. पूर्वीही ती 'चूल आणि मूल', 'रांधा वाढा, उष्टी काढा' यातच बंदिस्त होती; समाजात तिचा दर्जा दुय्यम होता तर अर्थकारण, राजकारणात नगण्य स्थान होते; आजही या स्थितीत फारसा बदल झालेला नाही. मधल्या साठ सत्तर वर्षाच्या काळात सरकारने कायद्याने स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. मुलाच्या टी. सी. वर आईचे नाव, वडिलोपार्जित संपत्तीत मुलीचा समान वाटा, शेतीच्या सातबाऱ्यावर तिचे नाव, लग्नानंतर स्वतःचे नाव न बदलण्याचे स्वातंत्र्य, राजकारणात स्त्रीला सन्मानाचे स्थान तर अगदी अलीकडे तीन तलाक पद्धती कायद्याने बंद करणे अशा सकारात्मक बदलाने स्त्रीचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न सर्वतोपरी केला गेला. असे असले तरी खास करून ग्रामीण भागातील समाजजीवनात तिच्या स्थितीत फारशी सुधारणा झाले असे म्हणता येत नाही. कायम कावाडकष्ट करणारी स्त्री कृषी संस्कृतीचा अविभाज्य घटक असूनही तिची कुठंच आणि कधीच दखल घेतली जावू नये, हे एक माणूस म्हणून तिच्यासाठी अत्यंत अपमानास्पद आहे. जमीन - जुमला, घर - दार, मुलं - बाळं, पैसा - आडका यावर तिचा मालकी हक्क असू नये ही बाब अत्यंत लाजिरवाणी होती. आजही यात फारसा सुधार नाही. आज बायका



कमावत्या असल्या तरी घरातील आर्थिक सूत्रे मात्र अजूनही पुरूषांकडेच आहेत. राजकारणात कायदा आहे म्हणून त्या निवडून येत असल्या तरी राजकीय प्रभाव आणि दबाव पुरूषांकडेच आहे. वरील वस्तुस्थितीचे प्रतिबिंब मराठी साहित्यातून उमटत गेले. प्रस्तुत लेखात त्याचा संक्षेपाने विचार करू.

**अ) पद्य साहित्यातील स्त्रीचित्रण :**

कविता हा साहित्यातील अत्यंत लोकप्रिय आणि तितकाच अनुकरणीय प्रकार आहे. आदिम काळापासून मानवाचा कवितेशी जवळचा संबंध आहे. व्यक्ती शिक्षित असो वा अशिक्षित त्याचा कवितेशी जन्मापासूनच संबंध येतो. लोकजीवनात जात्यावरच्या ओव्या, श्लोक, आरत्या, गवळणी, विविध उत्सव प्रसंगी गायिली जाणारी गीते, खेळ गीते, बडबड गीते अशा विविध गीत प्रकारांचा समावेश होतो. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध प्रसंगी गीते गायिली जातात. थोडक्यात भाषा, समाज, धर्म कोणताही असो त्यात लोकगीते असतातच. कवितेची जवळीक असणारा व्यक्ती प्रत्येक देशाच्या कानाकोपऱ्यात सापडेल. कवितेची इतकी व्याप्ती सांगता येईल.

आधुनिक काळात मराठी कवितेचे दालन अधिक वैविध्यतेने नटले. इंग्रजी साहित्याच्या अध्ययन आणि अनुकरणातून मराठीत कवितेचे वेगवेगळे प्रवाह रूढ झाले. केवळ रचनाप्रकारच नाही तर आशयाच्या दृष्टीनेही मराठी कविता अधिक समृध्द झाली. मध्य काळात भक्ती हेच कवितेचे उद्दिष्ट होते. आधुनिक काळात सामान्य विषय कवितेच्या केंद्रस्थानी आले. सामान्य माणसांची सुख-दुःखं कवितेतून अधिक परिणामकारकपणे चित्रित होऊ लागली. ग्रामीण जीवन, शहरी जीवन, आदिवासी जीवन कवितेतून मांडला जाऊ लागला. शेती मातीशी कविता जोडली गेली. शहरात झोपडपट्टीत कविता रमली. शहरातल्या चकचकीत रस्त्यावरून कविता सराईतपणे फिरू लागली. निसर्गात, पावसात मुक्तपणे कविता नाचू, वागडू लागली. जंगलात, दऱ्या-खोऱ्यात, वाऱ्याच्या संगीतावर पाना फुलांशी गप्पा

मारत कविता विहरू लागली.

कवितेतून व्यक्त होणारे स्त्री जीवन हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. मुळात काव्य आणि स्त्रिया यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. पारंपरिक जीवनात कविता स्त्रियांच्या जगण्याचा अविभाज्य घटक होती. आधुनिक काळात स्त्री जीवन कवितेतून सामर्थ्याने चित्रित होत गेले. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. खेड्यातील, वाडी तांड्यावरील सामान्य माणूस शिकू लागल्यामुळे त्यांचे जगणे कवितेतून चित्रित होऊ लागले. आधुनिक मराठी कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातून व्यक्त स्त्री जीवन. पद्यातून चित्रित होणारे स्त्री जीवन इथे संक्षेपाने समजून घेऊ.

प्रज्ञा दया पवार या मराठीतील आंबेडकरी कवितेच्या तिसऱ्या पिढीतील महत्वाच्या कवयित्री आहेत. 'उत्कट जीव घेण्या धगीवर', 'मी भिडवू पाहते समग्राशी डोळा', 'धादांत खैरलांजी' ही त्यांची महत्त्वाची साहित्य संपदा. आदिम काळापासून स्त्री पुरूष अशी तुलना भारतीय समाजात होत आली आहे. निसर्गाने स्त्री पुरूप निर्माण करून समाजाचा समतोल साधला आहे. माणूस म्हणून दोघे तितक्याच क्षमतेचे आहेत. असे असले तरी पुरूपप्रधान विचार सरणीमुळे स्त्रीला कायम दुय्यमपणाची वागणूक मिळत गेली. घर, गाव, समाज, देश, जग अशा चढत्या क्रमाने विचार केला तरी स्त्रीला समतेची वागणूक कधीच मिळाली नाही हेच चित्र दिसते. जगावर अधिराज्य गाजविणाऱ्या अमेरिका सारख्या प्रगत, पुरोगामी देशातही गेल्या २०० वर्पात एकाही स्त्रीला राष्ट्राध्यक्ष होऊ दिले गेले नाही यावरून पुरूपी अहंकाराचे नेमके स्वरूप लक्षात येते. परिणामी प्रज्ञा पवार यांनी लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन माणसाने स्त्रीचा एक माणूस म्हणून विचार करावा असे सूचित केले आहे. माणसाला लिंगभेदाच्या पलीकडे घेऊन जाणारी स्त्रीवादी जाणीव त्यांनी आपल्या 'थेरीगाथा इसवी सन दोन हजार सहा' या कवितेतून चित्रित केली आहे. प्रस्तुत कवितेतून बुद्ध तत्वज्ञानाच्या प्रकाशात माणसाला लिंग भेदाच्या

विचारांचा आधार घ्यावा असेही त्या सूचित करतात. बुद्धांनी आपल्या कृती आणि उक्तीतून स्त्री पुरूष समतेचा संदेश दिला. बुध्द तत्वाच्या प्रकाशात मार्गक्रमण केल्यास आजही लिंगभेदापलीकडील स्वच्छ, सुंदर, सुदृढ, समताधिष्ठित समाज नक्की निर्माण होईल, अशी आशा प्रज्ञा पवार यांनी वरील कवितेतून व्यक्त केली आहे.

'स्त्रीभ्रूण हत्या' ही आधुनिक काळातील अत्यंत गंभीर समस्या आहे. एकीकडे प्रगतीचे एकापेक्षा एक शिखर पादाक्रांत करायचे आणि दुसरीकडे स्त्रीला जन्म घेण्यापूर्वीच गर्भात मारून टाकायचे, हा समाजाचा अत्यंत विकृत चेहरा आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे स्त्री नसेल तर समाजाचा पर्यायाने जगाचा विकास होणे कदापि शक्य नाही हे सूर्य प्रकाशाइतके धडधडीत सत्य आहे. यात आणखी एक धक्कादायक बाब अशी की, स्त्री भ्रूण हत्येसाठी स्वतः स्त्रीच आग्रही असते. कधी वंशाला दिवा असावा म्हणून, कधी घरात अधिक मुली नको म्हणून, कधी लग्नाचा खर्च झेपत नाही म्हणून तर कधी निव्वळ अज्ञान म्हणून स्त्रीच मुलीच्या जन्मास विरोध करते. निसर्गाने स्त्रीला माणूस म्हणून फुलण्याचे, वहरण्याचे स्वातंत्र्य दिले असले तरी येथील पुरूष सत्ता मात्र तिला आणि तिच्या स्त्रीत्वाचा मुक्तपणे जगू देत नाही. स्त्री भ्रूण हत्येसारख्या प्रक्रिया समाजात रूढ करून स्त्रीचे अस्तित्व नाकारले जाते. यासाठी यंत्र, तंत्राचा खुबीने वापर केला जातो. यात पुरूष इतका निष्णात आहे की, कोवळा जीव खुडत असल्याचे पातक आपल्याला लागेल, याचे भानही त्याला राहिलेले नाही. सारिका उबाळे यांनी आपल्या निष्णात या कवितेतून वरील वास्तव चित्रित केले आहे.

'एक असते कळी
हिरव्यागार श्रावणाची
मऊसुत साय
तिला असतात



डोळे टपोरे
आकाशात फिरणारे
एक असतं मशीन
श्वास मोजणारं
त्याला कळतात
श्वास तिचे
एक असतं इंजेक्शन
फक्त कळ्यांनाच
निवडून काढणारं
आणि
आणि एक शस्त्र
असतं श्वासांना,
रक्त मांसाच्या
हजार तुकड्यात
बदलविणारं'[२]

स्वतः स्त्री असलेली, शिकलेली डॉक्टर आपल्या ज्ञानाचा, विविध यंत्राचा वापर करून स्त्री भ्रूण हत्या बिनदिक्कतपणे करते याचा अधिक त्रास कवयित्रीला होतो. केवळ व्यवसाय म्हणून, पैशाच्या हव्यासापोटी अशाप्रकारे शिक्षित मंडळी एखाद्या कसायाप्रमाणे वागत असतील तर त्यांना सुसंस्कृत कसे म्हणावे असा प्रश्न कवयित्रीला पडतो. काळ बदलला, आपण स्वतंत्र झालो तरी आपली मानसिकता मात्र बदलली नाही, हेच वास्तव वरील कवितेतून व्यक्त होताना दिसते. निसर्गाने कोणताही भेदभाव न करता प्रत्येक जीव जन्मास घालावा आणि माणसाने मात्र त्यात स्त्री पुरूष असा भेद करून स्त्रीच्या नरड्याला नख लावावे, ही निसर्ग विरोधी कृती आहे. याची किंमत नक्कीच मानवाला मोजावी लागणार आहे.

प्राण्यामध्ये मात्र अशाप्रकारचा भेदभाव कधी दिसत नाही. परंतु माणूस स्वतःच्या मर्जीखातर अमानवी कृत्य करतो. ही बाब केव्हाही विनाशाकडे घेऊन जाणारी आहे, अशी खंत कवयित्री व्यक्त करताना दिसते.

'हुंडा पद्धती' ही आजच्या समाजास लागलेली कीड आहे. वर दक्षिणेच्या नावाखाली पूर्वीही मुलीच्या वडिलांनी घर - दार विकले आहे आजही मुलीचे बाप कर्जबाजारी होत आहे. गरीब घरातील मुलीचे लग्नाचे वय वरचेवर वाढत आहे. कैक मुली या जीवघेण्या शर्यतीतून स्वतःची सोडवणूक करण्यासाठी आत्महत्या करणे पसंत करतात. वास्तविक विवाहासाठी एक समजदार, अनुरूप, योग्य वयाचे जोडपे लागते. परंतु विवाहातील फाजील डामडौल, मानपान, पोकळ प्रतिष्ठ जपण्यासाठी दाखविला जाणारा भपकेबाजपणा या अशा कितीतरी अतार्किक बाबींचा अतिरिक्त भार मुलीच्या वडिलांना सोसावा लागतो. लग्नाचा घोडेबाजारात अक्षरशः वरांना बोली लावून विकत घ्यावे लागते. या वास्तव परिस्थितीमुळे उद्विग्न झालेल्या स्थितीचे अतिशय दाहक, भेदक आणि उपरोधिक चित्रण कवयित्री अश्विनी धोंगडे यांनी केले आहे.

अश्विनी धोंगडे या आजच्या पिढीतील अत्यंत महत्त्वाच्या लेखिका आहेत. अत्यंत साधी, सरळ, स्पष्ट आणि रोखठोक निवेदन शैली हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 'स्त्रीसुक्त', 'पाषाणपुत्र', 'जस्मिन', 'स्पर्श', 'हारपळ' आदि त्यांची साहित्य संपदा. त्यांनी आपल्या 'या कवितेतून पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीचे असणारे दुय्यम स्थान, उपभोग्य वस्तू म्हणून तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि स्त्री जीवनाची दारूण अवस्था याचा समाचार उपहास, उपरोध, विनोद आणि विडंबनाच्या पातळीवरून घेतला आहे.

'विकणे आहे
एक उत्साही कामसू देखणे
जिवंत तरूण यंत्र



स्वैपाक करते
कपडे धुते
नोकरी करून
पैसा मिळवित
पाहुण्यांची सरवराई करते
घरसुध्दा झकपक ठेवते
आल्या आल्या हसून स्वागत करते
चहा पोह्याच्या डिशेस तयार ठेवते
शरीराची गरज भागवते
वंशाला दिवा देते
कधी बिघडलेच तर बडबड करते
चार दोन थपडात जागेवर येते
खर्चसुध्दा फार नाही
रोजच्या जेवणात भागून जाई
पन्नास हजारासहित सालंकृत घरपोच
त्वरा करा
आपली आर्डर आजच नोंदवा'[३]

वरील कवितेतून अश्विनी धोंगडे यांनी उच्च कोटीचा उपरोध व्यक्त केला आहे. सकाळपासून ते सायंकाळपर्यंतचा एका स्त्रीचा कुटुंबातील आणि कामाच्या ठिकाणचा दिनक्रम कवयित्री चित्रित करते. खास करून घरातील कोणतेही काम तिच्याशिवाय पूर्ण होत नाही. असे असले तरी तिचे स्थान एका यंत्रापेक्षा अधिक नाही. ही खरी शोकांतिका आहे. एक स्त्री कुटुंबाचा कणा असते. घरातील नित्य नैमित्तिक कामे तीच पूर्ण करते. घराचा वंश पुढे चालवते. शिवाय प्रसंगी नोकरी ही करते. घर सांभाळून नोकरी करताना तिची तारांबळ उडत असली तरी ती

त्याबद्दल तक्रार करत नाही. स्वतःच्या दुखण्या खुपण्याबद्दल तोंडून एक अक्षरही काढत नाही. या बदल्यात तिला दोन वेळचे जेवण मात्र दिले जाते. त्यातही बहुतेक वेळी ते शिळेच असते. कुटुंब शहरी असो वा ग्रामीण स्त्रीच्या ताटलीत मात्र बहुतेककरून शिळेच पदार्थ असतात. यामुळे तिच्या आरोग्यावर किती दुष्परिणाम होत असतील याबाबत कोणी विचारही करायला तयार नाही. ही वस्तुस्थिती पाहिल्यानंतर कवयित्री टोकाचा उपरोध का व्यक्त करते याचा अंदाज येतो. स्त्रीचे जगणे पूर्वीही यंत्रवत होते ते आजही आहे.

सहानुभूतीशून्य, कमालीचा आत्मकेंद्री, माणूसपण हरवत चाललेला समाज ही आजची गंभीर समस्या आहे. त्यातल्या त्यात स्त्रीच्या बाबतीत हा समज अधिकच सहानुभूतीशून्य होतो. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कायद्याने स्त्रीला अधिकार मिळाले असले तरी एक माणूस म्हणून समाज मनाच्या कोपऱ्यात तिला अजूनही स्थान मिळाले नाही, ही वस्तुस्थिती आजही नाकारता येत नाही. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रात काही बोटावर मोजता येणाऱ्या बायकांनी स्वतःचं वेगळेपण सिद्ध केलं आहे हे खरे असले तरी ही अपवादात्मक उदाहरणे आहेत. त्यांनी स्वतःचे वेगळेपण सिद्ध केलेले असले तरी यावरून सर्व स्त्रियांचे जीवनमान सुधारले असे मात्र म्हणता येत नाही. बोटांवर मोजता येतील इतक्याच स्त्रिया परंपरेने चालत आलेल्या दुय्यम वागणुकीच्या अंधःकारात काजव्याप्रमाणे चमकत आहेत. बाकी सगळीकडे तोच अंधार अधिक गडद होऊन आपली पाळंमुळं घट्ट करतोय हे वास्तवही नाकारता येत नाही.

नव्या पिढीतील स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणाऱ्या सशक्त कवयित्री नीरजा यांनी वरील पुरूषी वृत्तीवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. 'निरन्वय', 'वेणा', 'स्त्री गणेशा', 'निरर्थकाचे पक्षी', 'जे दर्पणी बिंबले', 'ओल हरवलेली माती' आदि त्यांची साहित्य संपदा प्रसिद्ध आहे. पुरूषप्रधान व्यवस्थेत स्त्रीच्या



वाट्याला आलेली पराधीनता, तिचे होणारे शोषण हे त्यांच्या लेखनाचे विषय आहेत. 'माणसं वाईट नसतात तशी' या आपल्या कवितेतून नीरजा यांनी पुरूषांच्या मनात स्त्री जीवनाबद्दल सहानभूती असूनही त्यांच्यातील आत्मकेंद्रीपणा, मतलबी वृत्ती आणि कातडीबचाव दृष्टिकोन व्यक्त केला आहे.

**'रस्त्याच्या मधोमध कोसळलेल्या विवस्त्र बाईच्या अंगावर**
**घालावी एखादी चादर असं वाटत नाही कुणालाच अलीकडे;**
**तिच्या स्तनातून पाझरणाऱ्या रक्ताची चिळकांडी**
**उडेल आपल्या चारित्र्यावर**
**म्हणून माणसं उभी आहेत दूर**
**भयाच्या आडोशानं.**
**माणसांना येत असते कीव त्या बाईची**
**तिनं जगायला हवं असंही वाटत असतं त्यांना तीव्रतेनं;**
**तिला घेतलं की काय मरणानं याचा वास घेत राहतात ती हुंगून हुंगून**
**तिला जगवण्याचा विचार मात्र येत नाही चुकूनही मनात.'**[४]

अलीकडे माणसे आत्मकेंद्री झाली आहेत. पूर्वी एकमेकांच्या सुखा-दुःखात सहजपणे मिसळणारा माणूस आज मात्र काहीसा अलिप्त झालाय. डोळ्यासमोर एखादी व्यक्ती मृत्यूच्या दारात असेल, तडफडत असेल तरी त्याच्याकडे सहानुभूतीने पहिले जाताना दिसत नाही. पहिले तरी मदत केली जात नाही. सद्याचे सामाजिक वातावरण प्रचंड गढूळ झाले आहे. कोणाचे कोणास फारसे देणे घेणे उरले नाही. पूर्वी ग्रामीण भागात एका घरी अप्रिय घडले तर संपूर्ण गावात चूल पेटत नसे. आज असे होताना दिसत नाही. माणसे अंतर्बाह्य बदलली आहेत. हा बदल उपकारक, सकारात्मक असता तर एकवेळ चालले असते पण यातून माणसं माणसापासून दूर जात आहेत. प्रेमाचा ओलावा आटत चालला आहे. भावनाशून्यता कमालीची वाढली आहे. डोळे आहेत पण त्यात परदुःखात दुःख शोधणारी दृष्टी

नाही, हात आहेत पण निरपेक्षपणे गरजवंतास मदत करण्याइतके दातृत्व नाही. समाजमनाचे हे बदलते स्वरूप नीरजा यांनी नेमकेपणाने टिपले आहे.

वरीलप्रमाणे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाज जीवनाचे बदलत गेलेले स्वरूप पद्य साहित्यातून प्रत्ययकारीपणे चित्रित होत आले आहे असे म्हणता येईल. मागील आठ सत्तर वर्षात बरेच अनुकूल बदल झालेली परंतु स्त्रियांच्या बाबतीत फारसी स्थिती सुधारली नाही. स्वरूप बदलून जुनी दारू पुन्हा नव्याने समोर आली असेच म्हणता येईल. महिला शिकल्या, राजकारणातही आल्या पण स्वतंत्र झाल्या नाहीत. विवाहादी महत्त्वाचा निर्णयही घेण्याचे स्वातंत्र्य त्यांना नाही. लहानपण वडिलांच्या, तरुणपण पतीच्या आणि म्हातारपण मुलाच्या ताब्यात ही स्थिती आजही कमीअधिक स्वरूपात तशीच टिकून आहे. मराठी कवितेने समाज जीवनातील स्त्रीचे स्थान नेमकेपणाने चित्रित केले आहे, हे मान्य करावे लागते.

**ब) गद्य साहित्यातील स्त्रीचित्रण :**

गद्य आणि पद्य हे साहित्याने दोन महत्त्वाचे प्रकार आहेत. पद्य साहित्य तुलनेने अधिक लिहिले जात असले तरी गद्य साहित्यात अनेक उत्तमोत्तम कलाकृती निर्माण झाल्या आहेत. गद्य साहित्यात कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या प्रमुख प्रकारांचा समावेश होतो. साहित्यात समाजाचे प्रतिबिंब उमटते. लेखक आपल्या इच्छेनुसार अभिव्यक्ती तंत्राचा वापर करू शकतो. लेखनासाठी कलाप्रकार निवडण्यासाठी आशयाला न्याय देऊ शकेल असा विश्वास लेखकास वाटणे आवश्यक असते. इथे गद्य साहित्यातून व्यक्त झालेल्या स्त्री चित्रणाचा विचार करू.

स्वातंत्र्यानंतर भारतीय समाज जीवनात खूप उलथा-पालथी झाल्या, बदल झाले. पारतंत्र्यातून मुक्त होऊन स्वातंत्र्यात पदार्पण करणे हे कोणत्याही समाजासाठी आनंदाची बाब असते. शिक्षण, राजकारण, समाजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात आमूलाग्र बदलास सुरुवात झाली. या सर्व बदलात स्त्री जीवन



बदलणे अपेक्षित होते परंतु असे झाले नाही. कायदा स्त्रियांना स्वातंत्र्य बहाल करीत असला तरी वास्तवात मात्र ते तसे नव्हते. पुरूषप्रधान संस्काराचे अवशेष स्वातंत्र्योत्तर काळातही टिकून होते. चूल आणि मूल ही स्त्रीची प्रतिमा स्वातंत्र्यानंतरही टिकून राहिली. स्वयंपाक घर ते देवघर इतकाच तिचा वावर मर्यादित राहिला. कुटुंबात आणि समाजात तिचे स्थान दुय्यम राहिले. कौटुंबिक हिंसाचार, शोषण कायम राहिले. तिची शारीरिक, मानसिक कुचंबणा तशीच कायम राहिली. या स्थितीचे वर्णन तत्कालीन गद्य साहित्यातून उमटत राहिले.

साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या कथा - कादंबऱ्यामधील स्त्रीचित्रण स्वातंत्र्योत्तर काळातील समाजजीवनाचे वास्तव प्रकट करते. अण्णा भाऊंनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडाचा अनुभव घेतला आहे. वाटेगावसारख्या खेड्यात जन्म आणि बालपण गेल्यानंतर पोटापाण्यासाठी ते मुंबईला गेले. अर्थात ग्रामीण आणि शहरी अशा वेगवेगळ्या दोन्ही स्तरातील स्त्रीजीवनाचा त्यांनी जवळून अनुभव घेतला आहे. स्त्रियांचे भावविश्व त्यांचे सामाजिक स्थान याबद्दल अण्णा भाऊंनी अतिशय समर्पक चित्रण केले आहे. तसे पाहता मराठी साहित्यात स्त्रियांच्या वास्तव जगण्याला अभिव्यक्त करणारे काही मोजकेच साहित्यिक आहेत, त्यापैकी अण्णा भाऊ साठे हे महत्त्वाचे लेखक होत. साधारण स्वातंत्र्यानंतरची पंचवीस ते तीस वर्ष अण्णाभाऊंनी आपल्या सकस लेखनात घालवली आहेत. परिणामी अण्णा भाऊंच्या कथा कादंबरीतील स्त्रीजीवनाचा साकल्याने अभ्यास केल्याशिवाय तत्कालीन समाजातील स्त्रियांचे नेमके स्थान अभ्यासता येत नाही. एक साहित्यिक समाजात घडत जाणाऱ्या विविधांगी ताण्याचा बाण्याचा साक्षीदार असतो. त्याने निर्माण केलेले साहित्य हे अशा वास्तवातून शब्द रूप घेत असते. म्हणून अण्णाभाऊ साठे यांनी स्वतंत्र भारतातील स्त्रीचे नेमके सामाजिक स्थान शब्दबद्ध केले आहे. ते पुढीलप्रमाणे विचारात घेऊ.

बरबाद्या कंजारी, चित्रा, वारणेच्या खोऱ्यात, वैजयंता, फकिरा, माकडीचा

माळ, तारा, मयुरा, रूपा, रत्ना, मंगला, फरारी अशा कितीतरी कलाकृतीतून अण्णा भाऊंनी तत्कालीन स्त्रीजीवन वाचकांसमोर आणले आहे. अण्णा भाऊंच्या कादंबरीतून अभिव्यक्त झालेल्या स्त्रीजीवनाचे अभ्यासक डॉ. लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे, ‘अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून गावपातळीवरील स्त्रियांचे जीवन रेखाटले आहे. याचबरोबर गावपातळीवर स्त्रीला जरी गृहलक्ष्मी समजले जात असले तरी तिला तसा दर्जा न देता तिचा पावलागणिक अपमान केला जातो. तुच्छतेची वागणूक दिली जाते. तिला घरातील पुरूषी अहंकाराला वळी पडावे लागते. तिला नीतीसंपन्न, घरंदाज, अब्रुदार म्हणून नुसते कोरडे कौतुक केले जाते. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना नेहमी दुःख व अपमान अवहेलनाचे कडू घोट सहन करावे लागले आहेत. पुरूषप्रधान, पितृसत्ताक कुटुंबपद्धतीच्या दवावाखाली जगत असणाऱ्या स्त्रियांच्या मनाचा कोंडमारा होत आला आहे. अशा काही कोंडलेल्या मनाच्या स्त्रियांचे जीवन अण्णांना जवळून पाहण्यात आले. त्यातून त्यांनी चिंतन मनन केले. त्यांच्या कोंडलेल्या मनाला आपल्या कादंबरीच्या माध्यमातून स्त्री जीवन त्यांनी चित्रित केले आहे.’[५] वरील मत अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजाने अजूनही स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारले नाही, हेच यातून सूचित होते. याला एखाद दुसरी स्त्री अपवाद असू शकते वा अण्णा भाऊंच्या कादंबरीतील फकिरा, सत्तू भोसले ही नायक मंडळी स्त्रीचा सन्मान करणारी आहेत. असे असले तरी ही उदाहरणे बोटावर मोजण्याइतकीच आहेत. शिवाय वरील उदाहरणे समाजाचे सर्व समावेशक चित्र ठरू शकत नाहीत, हे इथे विचारात घेणे आवश्यक आहे.

रंगनाथ पठारे हे मराठी कथा, कादंबरी विश्वातील अत्यंत महत्वाचे नाव आहे. गेल्या अनेक दशकापासून त्यांचे लेखन सातत्याने सुरू आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सामाजिक, राजकीय जीवनाचे ते महत्त्वाचे भाष्यकार आहेत. कथेशी विविध प्रयोग करणारे महत्त्वाचे लेखक म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी

भागणे आवश्यकच असते. मात्र भारतीय समाजात नीती अनीतीच्या नावाखाली स्त्रीला तिच्या शारीरिक भुकेबद्दल उघड बोलण्याचे, आपली गरज व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले नाही. परिणामी वरील गरजेची पूर्तता होण्यासाठी ती वेगवेगळ्या मार्गाचा लपून छपून अवलंब करत असते. हे असे आताच घडते असे नाही तर पूर्वापार परंपरेपासून हे असेच चालू आहे. अर्थात यालाही काही अपवाद आहेत. देवपूजा, कर्मकांड यात स्वतःला गुंतवून काहींनी स्वतःची कामुकता दावून टाकली आहे. काहींनी स्वतःला इतर कामात झोकून देऊन त्याकडे कायम दुर्लक्ष केले आहे तर काहींची ही भूक न शमल्यामुळे विकृतीच्या रूपात ती बाहेर पडली आहे. निसर्गाने दिलेली ऊर्जा वापरली जाऊ नये यासारखी दुसरी कोणती घुसमट असू शकत नाही. रंगनाथ पठारे यांनी स्त्रियांच्या जीवनातील या अतिशय महत्त्वाच्या विषयाला आपल्या लेखनातून शब्दवध्द केले आहे. स्त्रीला आदिम काळापासून लैंगिक स्वातंत्र्य दिले गेले नाही. आजही शहरी व ग्रामीण भागात ते दिले जात नाही. काही स्वतंत्र विचाराच्या स्त्रिया मुक्तपणे जगण्याचा प्रयत्न करतात पण त्यांना समाज उजळ माथ्याने जगू देत नाही. पुरूष विना स्त्री ही कल्पनाच समाजाला रचणारी नाही. आजही या विचारसरणीत फारसा बदल झाल्याचे दिसत नाही.

२०१८ सालचे युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरीकार नवनाथ गोरे यांनी आपल्या पहिल्या वहिल्या 'फेसाटी' आत्मकथनपर कादंबरीत धनगर समाजातील अल्पभूधारक स्त्रीचं जीवन रेखाटले आहे. आई आणि वहीण या रूपात नाथाच्या घरी ज्या स्त्रिया वावरतात त्यांच्या रूपाने त्या वर्गातील सबंध स्त्रीचे भावविश्व प्रातिनिधिक रूपात गोरे यांनी वाचकांसमोर मांडले आहे. घरी अल्प शेती. त्यात भावभावकीचे वाद. या वादाचा गैरफायदा घेणारे गावातील प्रतिष्ठित उच्चभ्रू. अडाणीपणाचा कायम गैरफायदा घेऊन लुवाडणारे सावकार. प्रतिष्ठित उच्चभ्रू. अडाणीपणाचा कायम गैरफायदा घेऊन लुवाडणारे सावकार. घरात खाणारी अनेक तोंड. मुलीच्या कर्जासाठी वशिला मागणाऱ्या पतसंस्था.

हा केवळ उपचार होऊन जातो. दोन शरीर, दोन मन, दोन कुटुंब एकत्र जोडणारा संस्कार राहतच नाही. तडजोडीतून जोडले गेलेले नाते बरेचदा पूर्णत्वास जात नाही. नाथाच्या बहिणीला ज्याप्रमाणे जीव गमवावा लागला तसे असंख्य स्त्रिया आपल्या प्राणाला मुकतात. ज्यात तिचा काहीही दोष नसतो.

आज शिक्षणाने आपण साक्षर झालेले असलो तरी विचाराने प्रगत मात्र झालो नाही. आजही मुलींना कसायाच्या दावणीला सहज बांधले जाते. तिला नरक यातना भोगण्यास बाध्य केले जाते. नशीब, पाप पुण्य, नीती अनीती अशा गोंडस नावाखाली तिची शुद्ध फसवणूक केली जाते. स्त्री फसते याचे महत्त्वाचे कारण तिच्याकडे आर्थिक सत्ता नसणे हे आहे. केवळ पदवी आहे पण चार पैसे कमावण्याचे कौशल्य नाही. पिंजरा तोडून जाण्याचे धैर्य तिच्यात नाही. परिणामी जे जीवन तिच्या वाट्याला आले आहे वा जे जीवन तिच्यावर लादले आहे, ते निमूटपणे किंवा आनंदाने वा नाईलाजाने स्विकारण्याशिवाय तिच्याकडे दुसरा पर्यायच उरत नाही. स्त्री आणि पुरूष एकाच रथाची दोन चाके आहेत. स्त्री शिवाय पुरूष आणि पुरूषाशिवाय स्त्री अपूर्ण आहे. हे वास्तव विचारात घेऊन प्रत्येकानी आपापल्या मर्यादेत राहणे आवश्यक आहे. दोघांना समान अधिकार आहेत याचे भान राखणे आवश्यक आहे. परंतु आजही स्त्रीच्या बाबतीत असे घडत नाही हे खेदाने मान्य करावे लागते.

**निष्कर्ष :**

स्वातंत्र्य मिळून आपल्याला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. या कालखंडात भारताने विविध क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती केली आहे. समाजाचा स्तर, राहणीमान सुधारले आहे. स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. हे खरे असले तरी तिला संपूर्ण स्वातंत्र्य मात्र मिळाले नाही. भारतीय समाज जीवनातील स्त्रीचे स्थान आणि त्याचे मराठी साहित्यातून उमटलेले प्रतिबिंबित याद‍ृष्टीने विचार केल्यानंतर पुढीलप्रमाणे काही महत्त्वाचे निष्कर्ष नोंदवता येतील.



१. कायद्याने स्त्रीला विविध अधिकार बहाल केले परंतु वास्तवात मात्र ते तिला दिले गेले नाहीत.
२. महिला शिक्षित, कमावत्या झाल्या तरी आर्थिक स्वातंत्र्य सर्व स्त्रियांना मिळाले नाही.
३. समाजजीवनातील तसेच व्यक्तिगत जीवनातील पुरूषप्रधानता अजूनही कायम टिकून आहे.
४. विवेकी जोडीदाराची निवड, लैंगिकता याविषयी बोलण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला दिले गेले नाही. एखादी स्त्री याबाबत बोलत असल्यास तिला समाजात आणि कुटुंबात नाकारले गेले.
५. जे चित्र स्वातंत्र्य पूर्व काळात होते तेच चित्र स्वातंत्र्योत्तर काळातही तसेच टिकून राहिले.
६. मराठी साहित्यात गद्य आणि पद्य प्रकारात स्त्री चित्रण अतिशय सशक्तपणे केले गेले.
७. समकालीन स्त्रीचे समाज जीवनातील स्थान मराठी साहित्यातून जशास तसे शब्दबद्ध झाले आहे.

थोडक्यात समाज आणि साहित्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. साहित्यिक एका बाजूने साहित्याशी तर दुसऱ्या बाजूने समाजाशी निगडित असतो. ज्या समाजात तो वावरतो त्या समाजाचे काही एक संस्कार त्याच्यावर होतात. त्याच्या लेखनातून त्याने घेतलेले अनुभव अभिव्यक्त होत जातात. परिणामी त्या त्या काळातील समाजाच्या प्रगती अधोगतीचा आलेख मांडावयाचा झाल्यास त्या त्या कालखंडातील साहित्य अत्यंत उपयुक्त ठरते, हे मान्य करावे लागते.

**संदर्भ सूची :**

१. आधुनिक मराठी कविता - (संपा.) डॉ. बाबूराव खंदारे व इतर - अथर्व पब्लिकेशन्स, धुळे - प्र. आ. १२ नोव्हेंबर २०१९ - पृ. ४२-४३.